
# शिल्प

दिलीप परीख





दिलीप परीख मूळचे कोल्हापूर चे शालेय शिक्षण कोल्हापूर, आणि पुणे इथे झाले. नंतर फर्ग्युसन कॉलेज आणि नंतर मुंबई मध्ये UDCT (University department of Chemical Technology) मध्ये केमीकल इंजिनीरिंग आणि फार्मास्यूटिकल (pharmaceutical) अशी combined डिग्री घेवून १९७० साली कॅनडा ला येणे झाले. आणखी Management चे शिक्षण घेता नोकरी सुद्धा सुरु झाली. १९७९ साली Johnson and Johnson मध्ये असताना अमेरिकेत बदली झाली. गेली ३५ वर्ष pharmaceutical industry मध्ये वेगवेगळ्या management positions मध्ये काम करुन गेल्या आठ वर्षापासून स्वतःची pharmaceutical consulting कंपनी चालवत आहेत.

या दरम्यान मराठी लिखाण जरी फारसे जमले नसले तरी मराठी, हिंदी आणि इंग्रजी नाटकांमध्ये अनेक भूमिका आणि दिग्दर्शन हे चालूच आहे. शिवाय गेल्या १७ वर्षापासून ''शब्दांच्या संध्याकाळी'' हा अनोखा कार्यक्रम ते आपल्या Maryland च्या घरात अनेक मित्रांच्या सहयोगाने आयोजित करीत आले आहेत.

# शिल्प

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

ई प्रकाशन : २३ ऑक्टोबर २०१८

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

माझ्या
अंतर्मनातील जाणिवेला,
प्रेरणेला समर्पित...

# शिल्प

## दिलीप परीख

**Written by**
**Dilip Parikh**
**Meryland. (U.S.A.)**

©
Dilip M. Parikh
10309 Kingsbridge Rd
Ellicott City, MD 21042

प्रकाशक :

**वंदन प्रकाशन**

अमरावती.

मुखपृष्ठ :
सुनील यावलीकर,
अमरावती.

मुद्रक :
मुकुंद आर्ट प्रिंटर्स
अकोट स्टॅण्ड, सुभाष चौक,
अकोला-मोबा. ९४२२१९३३२१

प्रथमावृत्ती :
एप्रील, २०१४

किंमत :
१००/- शंभर रूपये फक्त

# *मनोगत*

वास्तविक, कथा लिहिण्याचे कसं सुचलं आणि केंव्हा लिहायला सुरूवात केली ही सुद्धा एक कथाच आहे. पहिली कथा “ इनायतखाँ” ही लिहिली, ती १९६३ मध्ये, जी रविवार सकाळ मध्ये प्रकाशित झाली. कथा लिहिण्याचं वेड आमच्या घरांत मलाच कसे लागले हे एक मोठे गूढच आहे. तसें माझे वाचन भरपूर होते. विजय तेंडूलकर, पु.ल.देशपांडे, श.ना.नवरे, चि. वि. जोशी, रणजीत देसाई, बाबुराव अर्नाळकर, वसंत कानेटकर यांच्या पुस्तकांच्या वाचनान मला लिखाणाची स्फूर्ती मिळत गेली. कोल्हापूर–पुणे–मुंबई शिक्षणाच्यासाठी अभ्यास करता करता या कथासंग्रहातील सर्व कथा माणूस, स्वराज्य, लोकसत्ता इत्यादी विविध मासिके व वृत्तपत्रातून १९७० पर्यंत प्रसिद्ध झाल्या. १९७० साली भारत सोडल्या नंतर मराठी पुस्तके हाती लागणे कठीण झाले आणि आमची लिहिण्याची प्रतिभा हळूहळू कमी होत गेली. शिक्षण, नोकरी आणि संसार यातून वेळ मिळणे कठीण होउन गेले. वास्तविक, गेल्या १५ वर्षात माझे Pharmaceutical Industry मध्ये जगभर वापरल्या जाणारे पुस्तक आणि अनेक Scientific लेख प्रसिद्ध झाले आहेत पण मराठी लिहिण्याची प्रतिभा लाभू शकली नाही.

या कथा केंव्हातरी पुस्तक रूपाने प्रसिद्ध करण्याचे माझ्या अनेक मित्रांनी सुचवले होते, पण ह्या जुन्या कथा कोणाला आवडतील ? हा प्रश्न नेहमी पुढे येई आणि वेळ निघून जात असे.

हा कथा संग्रह आपल्या हाती येतोय याला तीन व्यक्ती कारणीभूत आहेत. सर्वप्रथम टोरोंटोच्या सौ. निशाताई देशपांडे काही वर्षापूर्वी त्यांनी माझ्या सर्व कथेची कात्रणं घेवून त्यांनी ती कात्रणे मराठी Font मध्ये Type करून दिले. ती डिस्क माझ्याकडे बरीच वर्ष पडून होती आणि एक एक वर्ष सरत होते.

पण मागील वर्षी Columbia, Maryland मधील सौ.प्रेरणा मोहोड कडू यांचे आई वडील अमेरिकेत भेटीला आले असतांना त्यांची भेट झाली अणि बोलता बोलता या कथांचा विषय निघाला. डॉक्टर वंदन मोहोड आणि डॉ. सौ. वीणा मोहोड यांनी अत्यंत उत्साहाने आपण हे पुस्तक प्रसिध्द करू या आणि आम्ही तुम्हाला मदत करू असे आश्वासन दिले. त्यांच्या मेहनतीने हे पुस्तक प्रकाशित होत आहे. सौ. निशाताई देशपांडे आणि डॉ.वंदन व डॉ. सौ. वीणा मोहोड यांचा मी ऋणी आहे. त्यांच्या पाठींब्याशिवाय आणि प्रोत्साहना शिवाय हा कथा संग्रह आपल्या हाती येऊ शकला नसता. डॉ. सौ. विजया खांडेकर यांनी प्रुफ तपासणीत सहकार्य केल्या बद्दल त्यांना धन्यवाद. आपल्याला देखील या जुन्या कथा आवडतील. हीच अपेक्षा...

**.....दिलीप परीख**

# अभिप्राय

मुलगी चि. सौ. प्रेरणा आणि जावई चि. निखिल अमेरिकेत असल्यामुळे त्यांच्या सतत संपर्कात येवून त्यांना मायेची सावली देवून त्यांचे परदेशातील वास्तव्य सूकर करणारे दिलीपदा परीख आणि त्यांच्या पत्नी डॉ.सौ. लिनाताई यांची एक सुरेख प्रतिमा आमचे मन:चक्षूसमोर चि. निखिल व चि. प्रेरणा यांनी शब्दांनी साकार केली होती. अमेरिकेला पोहोचल्यावर त्यांना प्रत्यक्ष भेटण्याचा योग आला व ही सुंदर प्रतिमा प्रत्यक्षातही तेवढीच किंबहुना त्यापेक्षा जास्तच रेखीव-आखीव, अनेक सद्‌गुणांनी अलंकारीत आहे असे जाणवले, ‘बाबा, दिलीपदा फार छान लिहितात. त्यांनी अनेक कथा  लिहिल्या आहेत, त्यांच्या कथा पुस्तकरूपाने छापता येतील काय? असा प्रेरणाचा तिच्या बाबांना प्रश्न आणि प्रेरणाच्या बाबांचेही लगेचच निखिल-प्रेरणा यांना आश्वासन, कथा न वाचताही.

नंतर छापण्याच्या प्रक्रियेत कथा वाचतांना दादांच्या स्वभावा ईतक्याच त्यांच्या कथाही तेवढ्याच प्रभावी असल्याचे जाणवले- आशय व प्रतिपादन शैली या दोन्हीबाबत. जीवनानुभवाची विविधता, मानवी स्वभावाची वैविधता, परस्परविरोधी स्वभावविशेष, याबरोबरच  नियतीचा खेळ, पुरूषांचा अहंकार, पलायनवाद, उपभोक्ता वृत्ती इत्यादी जीवनाचे विविध रंग त्यांच्या कथात आपल्याला रंगायला लावतात. ‘पराजिता’ या कथेत पांढरपेशावर्गात आढळणारा अलिप्तवाद, पलायनवाद, सावधगिरी (नसत्या कचाट्यात न पडण्यासाठी) ‘मला शक्य नाही. हे असे नाही त्या भानगडीत स्वत:ला लपेटून घेण्याचा माझा पिंड नव्हता’ तर दुसरीकडे इनायतखाँ सारखा गरीब परंतु शेरोशायरी करणाऱ्या कलाकाराला ‘दु:ख गिळून संसाराची मजा हसत खेळत कशी घ्यावी’ हे अवगत होते. घरात पत्नी अत्यवस्थ असतानांही मित्रांची शेर ऐकण्याची आवड  पुरविण्यासाठी  ‘मै आप लोगों का दिल दुखाना नही चाहता’ हे तत्वज्ञान आपल्याला स्तिमीत तर करतेच, त्या सोबतच माणसाची

दुसरी चांगलीही बाजू अधोरेखित करते. 'प्रतिक्षा' या कथेतील 'त्या' ची एकाग्रता, तिच्यासाठी असलेली आतुरता, तळमळ, चिवटवृत्ती, उन्हाचे भाले टोचत असतांना देखील 'एवढ्या उन्हानं काय होतंय ? एवढं सहन केलंच पाहिजे' कारण तिची प्रतिक्षा केली पाहिजे ही सोशीकता आहे. तर दुसरीकडे याच जगातील पुरूषाचे दुसरे रूप-स्त्रीशी प्रेमाचे नाटक करून तुच्छतेने लग्नाला नकार देणारा व अत्यंत तटस्थ राहून दुसरीलाही बदल्याच्या सुखापासून वंचित ठेवणारा उन्मेष आहे. याउलट स्त्री मात्र बदला घेण्याच्या निर्धारात देखील स्वत:ला झोकून देवून दोनही पातळीवर पराभूत होते. कधी 'मीलन' या कथेत स्त्री-पुरूष दोघेही निश्चयी, मनापासून एकमेकांवर प्रेम करत असतांना नियतीच त्यांना पराभूत करते.

अशाप्रकारे जीवनाच्या विविध अंगांना जाणण्याची, टिपण्याची क्षमता, दृष्टी, नजर दिलीपदात आहे. म्हणूनच त्यांच्या कथा मनाला हूरहूर लावतात, मानवी स्वभावाचे कंगोरे अधिक स्पष्ट, धारदार करतात. व नियतीसमोर माणूस कसा अगतिक आहे याची अनुभूतीही देतात. सुमारे ४० ते ४५वर्षापूर्वी लिहिलेल्या व प्रकाशित झालेल्या कथा असून देखील त्या कथा कालबाह्य झालेल्या नाहीत. मानवी मन, भाव-भावना, व्यक्तीची प्रसंगानुरूप साद देण्याची, लढण्याची वृत्ती, नातीगोती व त्यातील संघर्ष या सर्व गोष्टी काळानुरूप थोड्याफार बदलत असल्यातरी त्याचा मूळ गाभा तसाच राहतो. म्हणूनच या कथा देखील काळानुरूप आहेत.

वाचकांनाही या कथा भावतील यात शंकाच नाही.

दिलीप परीख यांना मनापासून शुभेच्छा...

***प्रा. डॉ.सौ.विणा मोहोड***
प्राचार्या
श्रीमती राधादेवी गोयनका
महिला महाविद्यालय
अकोला (महाराष्ट्र)

***प्रा. डॉ वंदन मोहोड***
माजी कुलसचिव
संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ
अमरावती (महाराष्ट्र)

# इनायत खाँ

*‘हुस्नपे परदा ये मतकर मिट जाता है*
*हुस्न हयस की आगमें लूट जाता है*
*हुस्नकी आग में इन्सान खुद मिट जाता है ’*

“वा ऽ वा ऽऽ वा ! सुभान अल्ला ! सुभान अल्ला !! काय पण शेर सुनावला इनायत खाँ तुम्ही ! वा ऽ जबाब नही !!” या व अशाच प्रकारच्या आनंदोद्‌गारांनी तो दिवाणखाना भरून गेला. सर्वजण अगदी खुशीत होते. नेहमीप्रमाणे माझ्या शेजारचे इनायत खाँ माझ्या घरी आले होते; आणि आम्हा मित्रमंडळीत बसून आपल्या शायरीने सर्वांना आनंदित करीत होते. इनायतखाँ हे माझे शेजारी. ३५ वर्षाची उम्र. किंचित् खुजा आणि किडकिडीत बांधा, आत खोलवर गेलेले भेदक डोळे, वेडीवाकडी उगवलेली दाढी, असा अवतार पाहिला की मला इनायतखाँबद्दल करूणा वाटे. पण अशा त्याशरिराकडे पाहिले, त्या भेदक डोळ्यांत डोकावण्याचा जरी मी कधी प्रयत्न केला, तरी तेथे काहितरी दुसऱ्यास सांगण्यासारखे आहे, पण त्याला वाव मिळत नाही, असे मला वाटे. इनायतखाँच्या डोळ्यांत जी करूणेची झाक दिसत होती ती त्यामुळे तर नव्हे ? डोळ्यात करूणा असली तरी ते कधी दुर्मुखलेले दिसत नसत.

इनायतखाँ सुमारे पांच वर्षापूर्वी आमचे शेजारी रहायला आले. मी सहज ओळख काढण्यासाठी त्यांच्या घरी गेलो. ते अेका खाजगी ऑफिसात क्लार्क म्हणून कामाला होते. त्यांच्या शायरीच्या नादामुळे त्यांच्याकडे येणाऱ्या सर्व मंडळीना त्यांचा सहवास उल्हास वाढविणारा वाटत असे. पत्नी आणि दोन मुले असल्याचे त्यांनी सांगितले.

ऑफिस सुटल्यावर मी फिरायला जाण्याऐवजी इनायतखाँ कडे गप्पा मारायला जाऊ लागलो. पुढे पुढे तर मला त्यांच्याकडे गेल्याशिवाय करमेच ना. त्याचे असे झाले. उर्दू भाषा मला जरी कळत नव्हती तरी उर्दू शेराबद्दल 'दिलचस्पी' असल्याचे मी जेव्हा इनायतखाँना सांगितले तेव्हा त्यांना कोण आनंद झाला. एरव्ही इनायतखाँ नेहमी आनंदी रहावयाचा प्रयत्न करीत. पण ज्यावेळी एखादा नवीन शेर त्यांना सुचत असे तेव्हा त्यांचा चेहरा गंभीर बनत असे. त्यांच्या त्या भेदक डोळयात एक प्रकारची चमक येत असे. शेर सुचला अन् समोर जर शेर ऐकणारा दर्दी असेल तर त्यांच्या उत्साहाला पारावर नसे. अशा लकबीत ते शेर ऐकवीत की 'दिल खूष' ऐकणाऱ्याचे !

माझे हे शायरी ऐकण्याचे वेड इनायतखाँ मुळे भलतेच वाढले. रोज कमीत कमी दोन तीन शेर ऐकल्याविना मला चैन पडेना. मी माझा हा छंद माझ्या दोन तीन जानी दोस्तांमधे सुध्दा फैलावला होता. त्यामुळेच रोज संध्याकाळी बहुतेक रात्रीच माझ्या दिवाणखान्यात 'मैफिल' जमत असे. त्याप्रमाणे आजची 'मैफिल' संपवून आम्ही खूष झालो होतो.

इनायतखाँची आर्थिक परिस्थिति फारच हलाखीची होती. दोन मुलांचा शाळेचा खर्च, पुस्तके, कपडे यांचा खर्च, बायको वरचेवर आजारीच असे, त्यामुळे महिन्याचा तिचा ठराविक खर्च ठरलेलाच. या सर्व दुःखांचा बोजा इनायतखाँच्या डोक्यावर असे; परंतु दुःख गिळून संसाराची मजा हसतखेळत कशी घ्यावी, ते त्यांना अवगत होते. ते मला नेहमी एक शेर ऐकवित आणि मी विचारात पडत असे-

*'' ना पैसे की कुछ परवाह की ।*
*ना अपने गमकी परवाह ॥*
*परवाह करनी ही पडी तो ।*
*अपने दिलकी परवाह की ॥''*

आणि मला इनायतखाँबद्दल मनात आदर वाटल्याशिवाय राहत नसे. हा आनंद त्या दिवशीच्या प्रसंगानंतर तर द्विगुणित झाला.

त्या दिवशी मी बराच खुषीत होतो. बरीच मोठी पगारवाढ मला मिळाली होती आणि माझ्या काही मित्रांनी आग्रह फार केला- 'पार्टी दे' म्हणून. तेव्हा त्यांना मी ''घरीच या'' म्हणून सांगितले. संध्याकाळ झाल्यावर मी इनायतखाँना पण बोलवायला गेलो. पण ते बाहेर गेले असल्याचे मला कळले. आठ साडे आठला सगळे मित्र गोळा झाले. ऑफिस मधुन येताना आणलेल्या खाद्यपदार्थांवर मित्रवर्य तुटून पडले. पत्यांचे डाव पडले. सिगारेटची थोटकं साचू लागली; प्रत्येक जण कंटाळला. १० वाजले होते; तेवढ्यात अविनाश म्हणाला ''अरे अरविंद, तुझ्या त्या इनायतखाँना का नाही बोलविलेस ?''

''अरे तुम्ही सगळे आलात तेव्हासुद्धा ते बाहेरच गेलेले होते.'' मी म्हणालो.

''मग आता आले असतील तर बघ ना ! त्यांचे नवीन शेर ऐकले तर आजच्या पार्टीला खरी रंगत येईल !''

सर्वांनीच आग्रह केल्यामुळे मी इनायतखाँच्या बिऱ्हाडी गेलो. दार वाजवले. इनायतखाँ बाहेर आले. त्यांचा चेहरा गंभीर होता. मला कळेना काय झाले आहे. त्यांनी विचारले, ''क्यों अरविंदजी ? क्या बात है ?'' मी मनात विचार केला, यांना बोलवावे की नाही? शेवटी मी भीतभीत माझ्या मित्रांची विनंती त्यांना ऐकवली. त्यांनी एकदा घरात पाहिल्यासारखे केले आणि मला म्हणाले, ''चलो मै आप लोगोंका दिल दुखाना नही चाहता ।'' मी त्यांना घेऊन रूममध्ये आलो आणि त्यांनी शेर सांगण्यास सुरवात केली.

*''अब आ गया तो सुनलो शेरे जबानी मेरी ।*
*शेरे जबानी कहेकर सुनलो कहानी मेरी ॥''*

आणि मग पुढील दोन तास कोणत्या धुंदीत गेले ते आम्हापैकी कोणालाच कळले नाही. फक्त कान ऐकत होते आणि अंतःकरण तृप्त होत होते. बारा वाजण्याच्या सुमारास इनायतखाँ थांबले. आम्ही सर्व एक प्रकारच्या बेहोषीतच होतो. त्यांनी आमचा निरोप घेतला आणि मैफिल बरखास्त केली.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे मला इनायतखाँचा मुलगा बोलवायला आला. काय भानगड आहे याचा विचार करीतच मी त्यांच्या बिऱ्हाडी पोहोचलो आणि तेथले दृश्य पाहून स्तिमित झालो. इनायतखाँच्या पत्नीचे प्रेत जमिनीवर होते. आतमध्ये रडारड चालली होती. बहुतेक त्यांचे नातेवाईक असावेत आणि शेजारी इनायतखाँ गंभीर चेहऱ्याने उभे होते. चौकशी करता मला कळले की त्यांच्या पत्नीची प्रकृति रात्रीच बिघडली होती. आणि रात्री दोन अडीचच्या सुमारास प्राणोत्क्रमण झाले होते. मला कसेसेच वाटले. इनायतखाँना काल बोलावले तेव्हां त्यांची पत्नी अत्यवस्थ होती आणि तरीही ते आमच्या विनंतीला मान देऊन मैफिलीत आले, शेर सुनावले. मला अपराध्यासारखे झाले. इनायतखाँकडे पहाण्यास माझे मन कचरू लागले. मन खाऊ लागले मला !

वरील प्रसंगानंतर इनायतखाँ माझेशी नेहमी प्रमाणे वागत असत पण ते पूर्वीपेक्षा थोडेसे गंभीर झाले होते. हे माझ्या नजरेतून सुटले नाही. वरील प्रसंगाच्या दुःखातून इनायतखाँ जरा कुठे डोके वर काढतात, तो त्यांना दुसरा फटका बसला. ते ज्या खाजगी कंपनीत नोकरी करीत होते त्या कंपनीचेच दिवाळे वाजले आणि त्यामुळे इनायतखाँ बेकार झाले. त्यांच्यावर पालनपोषणाची जबाबदारी होती त्यांच्या दोन मुलांची ! त्याचवेळी माझी बदली पुण्याला झाली. इनायतखाँना भेटलो आणि आश्वासन दिले की तिकडे काही नोकरी असल्यास ताबडतोब कळवीन. पण मला ते काही जमले नाही. इनायतखाँची एक- दोन वर्षे झाली, तरी काही बातमी लागली नाही.

दोन वर्षानंतर मी कोल्हापूरला ऑफिसच्या कामासाठी गेलो, तेव्हा इनायतखाँच्या बिऱ्हाडी गेलो, तो त्यांनी जागा सोडल्याचे कळले. दुसऱ्या दिवशी मला पुण्याला जाणे भाग होते. म्हणून मी काही खरेदी करण्याच्या निमित्ताने महाद्वार रोडवरील एका दुकानात गेलो; आणि एक-दोन वस्तु खरेदी केल्या. आता अंबाबाईचे दर्शन घेऊन, हॉटेलमधल्या रूमवर जावे असा विचार करून मी देवळाकडे जावयास निघालो, तो कोपऱ्यावरून मला हाका ऐकू आल्या, ''अरविंदजी ! अजी अरविंदजी'' मी चमकून तिकडे पाहिले तो एक खेळणी विकणारा फेरीवाला मला हाका मारीत होता. अधिक जवळ जाऊन पाहिले तो ते इनायतखाँच होते. इतके क्लेश झाले होते, इतके खंगले होते की मी त्यांना धड ओळखू सुध्दा शकलो नाही.

बऱ्याच सुखदुःखाच्या गोष्टी केल्या मी तिथे थांबून. त्यांनी घरी चलण्याचा आग्रह केला, पण मी त्यांना सांगितले, ''इनायतजी, मै रातको आऊँगा !'' त्यांचा पत्ता घेतला आणि रात्री जाऊन त्यांना भेटलो. नोकरी गेल्यावर त्यांनी बऱ्याच ठिकाणी नोकरीसाठी हेलपाटे घातले. पण नोकरी न मिळाल्या-मुळे एका मित्राकडून कर्ज घेऊन हा खेळणी विकण्याचा धंदा चालू केला होता. सुख-दुःखाच्या गोष्टी चालल्या होत्या पण माझ्या मनात एक निराळाच विचार घोळत होता. पण इनायतखाँना तो कितपत रूचेल याची मला चिंता पडली होती. पण मी शेवटी मनाचा हिय्या केला आणि म्हणालो *''इनायतखाँ, अगर एक बात कहूँ तो बुरा नही मानेंगें आप ?''*

*जी नही तो । क्या बात है अरविंदजी कहीये ''*

मी खिशातून पाकिट काढले आणि काही नोटा काढू लागलो तेव्हा इनायतखाँ ताड्कन उठले आणि त्यांनी माझे हात आपल्या हातात घेतले आणि म्हणाले *''नही अरविंदजी ! ये आप क्या कर रहे है ? किसीकी खैरातपर जीना क्या अच्छी बात है ?''* मला काय बोलावे ते सुचेना. तेवढ्यात इनायतखाँनी काही कागद काढले. त्याच्या वरची धूळ झटकीत ते मला म्हणाले, *''अरविंदजी अगर आपको मेरे लिए कुछ करनाही है तो ये रहे मेरे शेर । इन्हे आप आम लोगों तक पहुंचाइए ।''*

मी ते सर्व कागद गोळा केले आणि पिशवीत घातले आणि शक्य तितका प्रयत्न करीन असे आश्वासन दिले. त्यांना माझा पत्ता दिला आणि मी त्यांचा निरोप घेऊन निघालो.

पुण्याला माझा एक प्रकाशक मित्र होता, त्यास सर्व कल्पना दिली व त्याने ते पुस्तक छापण्याचे आश्वासन दिले.

काही दिवसांनी प्रकाशक मित्रानी ते पुस्तक छापले. मला त्यांनी पुस्तक दाखविले. मी हर्षानंदाने त्या पुस्तकाकडे पाहिले आणि का कोणास ठाऊक, दोन आनंदाश्रू माझ्या डोळ्यातून ओघळले आणि त्या पुस्तकावर पडले.

पुस्तक घेऊन मी ताबडतोब कोल्हापूरला आलो, मनात म्हणत होतो, ''इनायतखाँ आता बरेच खंगले असतील. पण हे पुस्तक पाहून त्यांच्या त्या करूण डोळयात जी आनंदाची उर्मी येईल ती पहाण्यास किती समाधान लाभेल नाही ?'' अशा प्रकारे

इनायतखाँ बद्दल विचार करीत मी त्यांच्या घरी गेलो आणि मला एक जबरदस्त धक्का बसला.

इनायतखाँचा मोठा मुलगा करीम दोन गुढग्यांच्या मधे डोके घालून बसला होता. मला एक अशुभ शंका आली, पण मी ती दाबून टाकली आणि करीमला विचारले, ''करीम, अब्बाजान कहाँ है ?'' त्याने माझ्याकडे एकदा पाहिले आणि त्याच्या डोळ्या-तून अश्रूंचा पूर लोटला. त्याने रडत रडत माझ्या खांद्यावर मान टाकली आणि तो म्हणाला ''अब अब्बाजान कहाँ बाबूजी, अब अब्बाजान कहाँ ! कल ही चल बसे वो तो । आपको बहुत याद किया उन्होने । आपके लिए खत भी छोड गए है ।'' असे म्हणत त्याने एक कागद माझ्या हाती दिला. मी कागद उघडून वाचू लागलो -

*''आखिरी शेर मेरे भाई जरा गौर से सुन ।*
*आखिरी बार सलाम अर्ज का दावा है ये ।।*
*इस दुनियाको दिखादे मेरा टूटा हुवा दिल ।*
*कहदे उनसे के मेरी दिल का तराना है ये ।।''*

मला काही सुचेना. अश्रु माझ्या डोळ्यात मावेनात. त्या अश्रुपूर्ण डोळ्यांनी मी समोर असलेल्या इनायतखाँच्या छोट्या फोटोकडे पाहू लागलो, आणि माझ्या डोळ्यातले अश्रू थांबले. मी पहात होतो इनायतखाँच्या त्या करूण डोळ्यांत, मी शोधत होतो, आणि मला अखेर समाधान लाभले. त्या करूण डोळ्यातून मला आनंदाची उर्मी दिसली.

''सकाळ '' ( ६ ऑक्टोबर, १९६३ )

# प्रतीक्षा

सकाळची वेळ । घड्याळाच्या काट्यांनी प्रवास केला आहे. नऊ आकड्यांच्या पलीकडे ! अखंड प्रवासाची उमेद बाळगीत !

सूर्याने आकाशाच्या नील पृष्ठावर पिवळ्या रंगाचा पट्टा ओढण्याचा वृथा प्रयत्न केला आहे. या झाडांवर ! या घरांवर !! त्या दुकानांवर !!! साऱ्या साऱ्या पृथ्वीवर ! जगाच्या रंगभूमीवर ! अनेक प्रकारची सोंगे घेऊन वावरणाऱ्या ह्या दुनियेतील मतलबी मनुष्यावर ! ह्या मतलबी दुनियेची काळी कामे लपवण्यासाठी सूर्यसुध्दा त्यांना मदत करीत आहे, अनेक रंगाची पुटे देऊन ! वर्षानुवर्षे !! युगानुयुगे !!!

अशावेळी तो पुन्हा एकदा गॅलरीत येतो. वेडावल्यासारखा ! आळसलेला !! हपापलेला !!! काहीतरी शोधते त्याची नजर. तो इकडे तिकडे पाहतो आणि आपल्या नजरेची फेक समोरच्याच घरात टाकतो, अचूक ! घर शांत असते. निराशेने नजर उचलतो आणि रस्त्यावर टाकतो. रस्ता गजबजलेला असतो. एक माणूस स्कूटरवरून जात आहे. मागे त्याची बायको बसली आहे. पण बायकोच कशावरून ती ? नाही; पण बायकोच असावी ती,

त्याशिवाय का इतकी चिकटून बसलेली आहे; त्या माणसाशी ! तो चमकतो. कातावून पुनः समोरच्या घरात बघतो. त्या घराच्या खिडकीकडे ! खिडकी उन्हाळयांत आटलेल्या झऱ्याप्रमाणे शुष्क असते ! कोरडी असते ! ती आली पाहिजे. ऋतु वसंतासारखी, मनाच्या शुष्क झाडाला पालवी फुटण्यासाठी! पण अजून कशी आली नाही ती ? रोज यावेळी ती तिथे असते. वेणीफणी करीत. साज-शृंगार करीत. तिचे काही बरं वाईट तर झाले नाही ना ? वेडी शंका त्याला डिंवचते. झुरळासारखा तो तिला झटकतो. फार दूर ! परत न येईल अशा जागी .

त्याची नजर पुनः रस्त्यावर घसरते. काळसर हिरवटपणा रस्त्याला आलेला आहे. त्यावर अनेकरंगी ठिपके फिरताहेत. कुणी चालत, कुणी सायकलवर, कुणी स्कुटरवर, कुणी फटफटीवर तर कुणी मोटारीतून. इतर जगाविषयी तुच्छतेची भावना बाळगीत. रस्त्याचं इंद्रधनुष्य झालेलं त्याला दिसतं. त्या इंद्रधनुष्यातले निरनिराळे रंग तो न्याहळू लागतो. लाल रंगावर त्याची नजर स्थिर होते. चार-पाच पोरी हंसत खिदळत चाललेल्या असतात. त्यातली एकजण कुठेतरी आपल्या बोटाने काहीतरी दाखवीत. त्याला वाटतं ती वेडी असावी. पण ती बोट दाखवीतच रहाते. सगळ्याजणी त्या दिशेने पहातात. तो घाबरतो. त्याला वाटतं, ह्या सगळ्या आपल्याकडे पहात आहेत. तो गडबडतो. तेवढ्यात एक विमान वरनं जातं. वेड्यासारखा तो त्या घरघर करीत जाणाऱ्या यांत्रिक घारीकडे पहातो. तो कानावर हात ठेवतो. ती घार निघून जाते. तांबडे ठिपके वरती बघतच असतात. 'त्या नक्की, माझ्याकडं पहात

आहेत. तसा मी स्मार्ट आहे म्हणा.' गुलाबी विचार त्याला थोपटतात. तो सुखावतो, भारावतो. तांबडे ठिपके हळूहळू नजरेआड होतात. ते व्हायला नकोत. त्यातला एक ठिपका तरी परत आला पाहिजे. तो मागे वळून पहाणारा ! पण तो ठिपका तसाच जातो. सिग्नल दिलेल्या रेल्वे सारखा सुसाट ! निर्विकारपणे ! निश्चिंतपणे ! निर्धोकपणे! तो  बेचैन होतो. तांबडा ठिपका हळूहळू मनातून ओसरतो. मन रितं होतं. पेनमधून शाई ठिबकावी तसा तो ठिपका पाझरतो आणि पुढं कुठेतरी जातो. दूरवर !

पण ती अजून कशी आली नाही ? एव्हाना ती आली पाहिजे. तो घड्याळाकडे पहातो. काट्यांचा प्रवास संथ चाललेला असतो. काट्यांचा लपंडाव चाललेला आहे. पण किती संथपणे! जेवून सुस्त झाल्या सारखा. निष्काळजी ! आपल्या नजरेचं झाकण तो घड्याळावरून  काढतो आणि  खिडकीवर लावण्याचा विचार करतो.  पण..... पण खिडकी मोकळी असते. ती अजून कशी आली  नाही ?  आलीच पाहिजे ती.

त्याचा भावनेचा सरडा रंग बदलतो. काय करायचं आहे इथं थांबून ! मरू दे की.  ती ! नाही ! पण ती येते तेव्हा कसं बरं वाटतं. चांदण्यात सहल केल्यासारखं चंदेरी ! गोडसर ! आनंदी ! पण त्यासाठी ती आली पाहिजे,  नाही का ?

तेवढ्यात त्याला कोणीतरी बोलावतं, ''पेढे ! अहो पेढे !'' 'काय बुवा कटकट आहे' त्याला बोलावणे नको असते.

कातावलेली नजर तो आवाजाच्या दिशेने टाकतो. घारुअण्णा खालून हांका मारत असतात. तो तिकडे लक्ष देत नाही. उगीचच स्वतःला सावरतो. त्या घारुअण्णांच्या जागी त्याला काहीतरी विचित्र दिसतं. काहीतरी वेगळं ! काहीतरी निराळं ! घराबाहेर चाललो असताना 'कुठे चाललात ?' म्हणून विचारणाऱ्या माणसासारखा ! विघ्नसंतोषी ! त्याला घारुअण्णा नको असतात. तिथं पोकळी झाली तरी काय मौज येईल नाही ? आणि ती पोकळी तशीच पसरत जावी. या रस्त्यावरून तऽऽशी पसरत जावी ! धरण फुटलेल्या पाण्यासारखी! चौफेर ! मस्तावून ! पण ..... पण मग ती समोरच्या घरापर्यंत जाईल की ! नाही ! तसं व्हायला नको. नाही! पण ते घर गेलं तरी हरकत नाही त्या निर्जिव पोकळीत, पण ती खिडकी ! तशीच राहिली पाहिजे. ध्रुवताऱ्यासारखी अढळ !

'पेढे ! अहो पेढे ! खालून पुन्हा आवाज येतो. काय चिकट आहे हा घारुअण्णा ? डिंकासारखा. तो घारुअण्णाकडे दृष्टिक्षेप टाकतो. त्यांच्या त्या आर्ततापूर्ण करूण डोळ्यात आपले डोळे सामावतो. 'तुम्हाला वेळ आहे का आता ?' करूण नजर बोलते. आता त्याला वेळ कशाला पाहिजे? पैसे मागायचे असतील ? पण ह्याने किती पैसे नेले, निकडीची गरज आहे, निकडीची गरज आहे म्हणून ? कधी कोर्टाचा दावा ! कधी देणेकऱ्यांचे पानासारखी. म्हणजे तो भास होता तर ? ओशाळतो. त्याला उगीचच 'बेबंदशाही' नाटकातला संभाजी दिसतो. तो बोलतो, 'सृष्टीची उलथापालथ तर झाली नाही ना? मुंग्यांनी मेरूपर्वत तर गिळला नाही ना? वडवानलांनी अरबी समुद्र तर जाळला नाही ना? मग? मग आम्हीच असे

कमनशिबी कसे ? की .....की' त्या पुढचं आठवत नाही. तो घुटमळतो, आठवण्याचा चाळा करतो पण स्मरणशक्ति दगा देते. तो त्याचा नाद सोडून देतो. 'मी खरंच कमनशिबी आहे. निदान आज तरी.' अजून कशी आली नाही ती ? ती आली पाहिजे.

तेवड्यात त्याच्या नाकपुड्या उत्तेजित होतात. अहाहा ! खमंग भज्यांचा वास ! काय मस्त करतो तो कोपऱ्यावरला भैय्या ही भजी! गेली पंधरा वर्षे दुकानात नुस्ती भजी विकतोय, पण पैसा काय कमावला ! दुमजली इमारत बांधली आहे म्हणे गावाबाहेर! पण ही चिंचोळी जागा काही सोडतल नाही आणि किती मोठे मोठे लोक येतात नाही त्याच्याकडं भजी खायला! तो उगीचच हसतो. वेड्यासारखा तोडाला सुटलेलं पाणी तो पितो. त्याला भजी खाल्याच्या आनंद होतो पण जीभ पुन्हा खवळते. भैय्याच्या दुकानातल्या गर्दीला तो दिसतो, ती त्याला वेडावीत असते. टुक टुक करीत एकेक भजी तोंडात टाकत असते. तो खवळतो. भैय्याच्या दुकानात सरळ शिरतो आणि भैय्याला मारतो ! धोपटतो ! पिटतो ! आणि परातीतली सगळी भजी खाऊन टाकतो आणि कढईतलं उकळतं तेल भैय्याच्या अंगावर ओततो. पण त्यातलं थोडे तेल त्याच्या पायावर पडते. तो तिरीमिरीनं झटकन् खाली वाकतो. पायावर चढलेली लाल मुंगी कावून चिरडतो. शत्रु चिरडल्यासारखा! ती गर्दी त्याला हिणवत असते. त्याला भजी खायला जायचं असतं; पण तेवढ्यात ती येऊन गेली तर ? नाही ! ती आता येईल, आलीच पाहिजे ती !

त्याला त्या भैय्याची भजी कुजकी वाटतात! नासकी वाटतात! रोगट वाटतात! भजी खाणाऱ्या गर्दीला रोग होतो. विषबाधा होते. गर्दी धडपडते. कासावीस होते. भडाभडा ओकते, तो मोठ्याने हसतो. पोट धरून हसतो. गर्दीच्या डोळ्यात प्राण येतात. गर्दीची जीभ लुळी पडते. तो हसतच असतो. हसता हसता त्याच्या डोळ्यातून पाणी येते.पण त्याचे तिकडे लक्ष नसते. तो आनंदाने, असूयेने हसतच असतो. मोठ्याने !!!

उन्हाचे भाले त्याला टोचत असतात. ते भलतेच धारदार झालेले असतात. ''किती वेळ असं तिष्ठत उभं रहावं लागणार आहे तिची प्रतीक्षा करीत ?'' '' अगदी थोडा वेळ ना ? मग एवढ्या उन्हानं काय होतंय् ? एवढं सहन केलंच पाहिजे !'' तिची प्रतीक्षा केली पाहिजे. त्या रित्या खिडकीकडे तो नव्या उमेदीने पहातो. त्याच तल्लीनतेने ! त्याच... त्याच चिकाटीने !

'लोकसत्ता '( २० जून, १९६५ )

# मीलन

सूर्य नुकताच मार्गस्थ झाला होता. सारे आसमंत सोनेरी रंगाने न्हाऊन निघाले होते. आपल्या तेजाचं दान करीत रविराज हळू हळू वर येत होता. निष्कामपणे उपकृत करीत! त्या नदीचे वाहते पाणी खळखळत सकाळच्या त्या मंद वातावरणात एक अजब असा नादरव करून जात होते. ज्या संगीताने मोठ-मोठ्या कवींना वेड लावले, उत्स्फूर्त केले, ते संगीत, ती नदी चौफेर उधळीत चालली होती. आणि त्या नदीशेजारी असलेले ते पडके मंदीर! सारे शांत होते तिथे. त्या पडक्या वास्तुकडे त्या उपेक्षित शिल्पाकडे पहात निश्वास टाकीत नदी पुढे पुढे जात होती. एक काळ होता भरभराटीचा त्या मंदिराचा. तो आठवीत ती चालली होती. त्याच पूर्वीच्या स्थितप्रज्ञतेनं!

त्या मंदिराकडे येणारी वाट आता गवताने आणि छोट्या झुडुपानं झाकली गेली होती. एक अस्फुट अशी पायवाट काय ती शिल्लक राहिली होती. मुख्य रस्त्यावरून वळून मालती लगबगीनं त्या रस्त्यावर आली. हातातील पिशवी सावरीत आणि त्या निर्जन वाटेवर चौफेर नजर टाकीत कावरी बावरी होत ती त्या मंदिराकडे

येत होती. पायाखालील गवतावर असलेले दवबिंदु तिच्या साडीवर उड्या घेत होते. ती पायवाट संपली आणि मंदिराच्या आवारातील त्या भव्य वडाच्या झाडाखाली आल्यावर तिच्या जिवात जीव आला. त्या वडाच्या पारावर आल्यावर सारे आसमंत ओळखीचे वाटू लागले. बरेच चालून आल्यामुळे तिच्या कपाळावर धर्मबिंदू जमा झाले होते. ते तिने आपल्या पदराने हळूवार हातांनी टिपले. वडाच्या त्या गार सावलीची जाणीव एक अननुभूत आनंद देऊन गेली. थोडीशी जागा साफ करून ती तिथं बसली आणि वडाच्या पारावर पिशवी ठेवून ती इकडे तिकडे पाहू लागली. सारं कसं स्तब्ध होतं, शांत होतं !

हातातील घड्याळकडं नजर टाकली तो साडेनऊ वाजले होते. अजून आला नाही श्रीधर? कमाल आहे! नेहमीचंच आहे त्यांचं. कधी वेळेवर आला असेल तर शपथ. ते कबुतरांच जोडपं साक्ष आहे. नकळत मंदिराच्या कोपऱ्यात असलेल्या कबुतरांच्या जोडप्याकडे लक्ष गेलं. त्यांचा तिला हेवा वाटला. आणि नकळत श्रीधरचे अत्यंत आवडते गाणे तिच्या तोंडात घोळू लागले. श्रीधर नेहमी गुणगुणत असे--

*''प्रीतम आन मिलो ऽऽ*

*दुखिया जिया पुकाऽऽरे*

*प्रीतम आन् मिलो--''*

त्या गीतातील कारूण्य, भेटीची ओढ, विरहाच्या यातना, श्रीधरच्या गुणगुणण्यातसुध्दा तिला नेहमी जाणवत असते.

हातातील पर्समधून तिनं एक चिठ्ठी काढली. श्रीधरनंच पाठवली होती काल. चिठ्ठी उघडून पुन्हा एकदा खात्री करून घेतली. 'सकाळी ९॥ वाजता मंदिरात' एवढंच लिहिलं होतं. त्या भग्न देवालयातील उपेक्षित मूर्तीसमोर ते विवाहबध्द होणार होते. त्या मूर्तीचे आणि त्यांचे फार जिव्हाळ्याचे संबंध होते. याच मूर्तीसमोर त्यांनी लग्नाच्या आणाभाका घेतल्या होत्या आणि त्याच श्रध्दापूर्ण अंतःकरणांनी ते दोघे आता मूर्तीच्या साक्षीनं विवाहबध्द होणार होते. आणि नंतर ठरल्याप्रमाणे श्रीच्या एका जिवलग मित्राकडे औरंगाबादला जाणार होते. तिथे कोणी देखील ओळखणार नाही; जिथं इथल्या ओळखीच्या विषारी नजरा नसतील, त्या सर्वा-पासून दूर. अण्णांच्या पासून दूर ! अण्णा--!

तिच्या अंगावर नकळत काटा आला. त्वेषानं तिनं मान झटकली. अण्णांचा तो वैतागलेला, रागानं लालबुंद झालेला चेहरा आठवला. त्यांना इतकं रागावलेलं तिनं कधी पाहिलं नव्हत. त्या लालबुंद डोळ्यातील क्रोध अजूनहि तिला आठवत होता. तिला पहायला येणार आहेत हे जेव्हा अण्णांनी सांगितले तेव्हा ती म्हणाली होती, ''अण्णा मी श्रीधरशीच लग्न करणार आहे. मला कुणासहि दाखवायच्या फंदात पडू नका.''

अंगार ओकणाऱ्या त्या डोळ्यातील स्वाभिमान डिंवचला गेला होता ! मायेच्या काचपात्राचा चक्काचूर झाला होता !!

''काय म्हणालीस ?'' त्वेषानं ते उसळले. ''नोकरी करून चार रूपये घरी आणलेस म्हणजे तुला काय वाटतं या घराची स्वामिनी झालीस ?''

''पण अण्णा तुम्ही --'' ती अडखळली.

''बोल ! बोल ! चालू दे थोबाड तुझं. थांबलीस कां? कोण कुठला तो श्रीधर कारकुंडा. कारकुंडा ! ना घर ना दार ! आई-बापाचा तरी पत्ता आहे का त्याच्या ? म्हणे त्याच्याशीच लग्न करीन. अण्णांच्या अस्थि अजून उठल्या नाहीत म्हटलं. जरा घरच्या अब्रूचा तरी विचार करायचा होता. या पिकल्या केसांचा तरी मान ठेवायचा होता, त्या भिकारड्याच्या गळयात माळ घालण्याआधी - ''---'' 'अण्णा ऽऽऽ' मालतीला सहन होईना आता अण्णांचं बोलणं.

शेजारच्या झाडावरून दोन कवडे चित्कार टाकीत झाड सोडून उडाले. ती चमकली. मनांतील विचारांची साखळी तुटली. हातातल्या घड्याळाकडं पाहिलं तो दहा वाजलेले. अजून कसा आला नाही श्रीधर ? आज फारच वेळ केला बाई त्यानं ! एवढा उशीर कां ? ते प्रश्नचिन्ह मोठं मोठं होऊ लागलं. मनातील आतुरता संपू लागली. भीतीनं तिला ग्रासलं. समोरच्या कोपऱ्यातील ते कबुतराचं जोडपं तिला हिणवत होतं. या कबुतरांनी श्री आणि मालतीच्या मधुर भेटींची लज्जत चाखली होती.

त्या कबुतरांनी मालतीच्या मनांतील गुलाब फुलवला. त्याची लाली तिच्या गाली अवतरली...

... ती कालेजच्या नाटकांतील श्रीची भूमिका....

काय रंग भरला होता त्यानं नाटकांत ? ..... आणि श्रीला मिळालेलं ते प्रथम पारितोषिक....... आपण दिलेले हार्दिक

अभिनंदन .... त्यावेळची ओळख ..... ''हार्टी काँग्रेच्युलेशन्स.... खरंच छान काम झालं तुमचं'' 'इज इट ?' त्या गहिऱ्या डोळ्यातील तो मिस्किल भाव ....'थँक्यू. बाकी ओळख काढण्यासाठी हा एक प्रभावी मार्ग काढलात बरं कां ?' 'इश्य काहीतरीच काय ?' मनातील गुपित उघडं पडल्याच्या जाणीवेनं मालती तिथून पळाली. लाजून ! आरक्तीने न्हाऊन.

नंतर नेहमीच ते चोरून हंसणं; लायब्ररीच्या कॉरिडॉरमधील क्षणिक मुलाखती ... पुस्तकांची देवाण घेवाण... त्यांतील ती पत्रे ... कँटीनमधील मुलाखती .... गावाबाहेरील भेटी .... याच मंदिरातील ती प्रथम दीर्घ भेट .... अनभिषिक्त नेत्रांनी न्याहाळणारे श्रीचे बोलके डोळे आणि श्रीचं गुणगुणणं...

'प्रीतम आन मिलो ऽऽऽ'

कबुतराच्या फडफडीने आणि एकसारख्या घुमण्यानं ती सत्यांत आली. तिच्या विचाराच्या सरड्यानें रंग बदलला. अजून कसा आला नाही श्री- त्याचं काही बरं वाईट तर झालं नाही ना ? छे ! तो विचार तिनं झटकून टाकला. अंगावर चढलेला किडा झटकावा तसा ! शिसारीनं ! कोणत्या भितीनं ! अभावितपणानं !

तिच्या विचाराची चक्रं उलटसुलट फिरू लागली. एकमेकावर आपटून दमू लागली. त्या शांततेत नदीच्या पाण्याचा तो मंजूळ नादरव पार्श्वभूमी तयार करीत आहे असं तिला वाटलं. शरीरातील रक्तानं भितिला जन्म दिला जणू. श्रीची वाट पहाता पहाता ती थकली. उत्साह ओसरू लागला. मनाचा विरंगुळा संपला

होता. त्या कबुतराच्या जोडप्याला हुसकून लावावेसं वाटलं. तिच्या जिवाची घालमेल चालली होती. श्री येणार की नाही ? या गावातून निघून जाण्याची योजना व्यवस्थित पार पडावी म्हणून किती दक्षता घेतली आहे त्यानं व आता उशीर करतोय. तिच्या मनाला चकवा लागला.

साऱ्या परिसरात तिच्याशिवाय कोणी नव्हतं. होती ती फक्त नेहमीची कबुतरं आणि ती !

आणि ती चमकली. 'हो श्रीच की, पायवाटेनं इकडेच येत आहे. किती वेळ केला बाई त्यानं ! सारं कसं सुगंधित वाटू लागलं. सारं उत्साहित वाटू लागलं. उत्साहानं पुढे पडलेली पावलं थबकली. मालतीच्या मनात आले, 'छे, असं अधीर होऊन कसं चालेल?. आता खूप खूप रागवायचं ! का एवढा उशीर केलास? आमची काही काळजीच नाही तुम्हा पुरूषांना! हडसून खडसून झाल्या उशीराबद्दल जबाब मागायचा. आणि मग तो आपली लाडीक समजूत घालील. लाडी गोडी लावेल. पण छे, यावेळी मात्र जरा देखील झुकायचं नाही. स्वतःला काही अभिमान आहे की नाही ? उगाचच काहीतरी काय ?'

श्री जवळ आला. न राहवून ती धावत धावत पुढं आली. क्षणभर अडखळून पुन्हा ती पुढं धावली. श्रीच्या चेहऱ्यावरचे विजयाचे भाव पाहून तिला स्वर्ग दोन बोटं उरला. तो लगबगीनं जवळ आला.

''मालू'' येताक्षणीच तो म्हणाला. 'हे बघ, झटपट चल पाहू मंदिरात . आता वेळ नाही आपल्याला.''

''हाऽऽ हा आधी स्वतःच वेळ करायचा व मग गडबड करायची. आणि हे काय ? हार आणले नाहीस ते ?''

''करायचेत काय हार ? खरं म्हणजे मी गडबडीत विसरलो. येता येता ही दोन फुले घेतली शेजारच्या बागेतून तोडून आणि आलो. मंदिरात आता जाऊ आणि औरंगाबादला गेल्यावर धार्मिक विधीचे पाहू.''

श्री आणि मालती मंदिरात आले. त्या शिवलिंगाचे अवशेष काय ते शिल्लक राहिले होते. हातात असलेली दोन फुले श्री ने पुढे केली. मालतीने त्यातील एक फूल घेतले व दोघांनी मोठ्या भक्तिभावानं आपल्या हातातील फूल त्या पिंडीवर चढवले; आणि प्रणाम केला. दोघेहि मंदिरातून त्या पाराजवळ पुन्हा आले. मालती कुठंतरी हरवली होती. पिंडीवर फूल चढवताना आपल्याला असे का वाटले. लग्न! आयुष्यात एकदाच येणारा क्षण ! कसा वाजत गाजत आला असता एरवी ! ते कौतुक, ती थट्टा, त्या साड्या दागिने विविध आभूषणे, वऱ्हाडी मंडळीचा गोंधळ, जेवणावळी, मुंडावळ्या बांधून सुशोभित मांडवाखाली होम-कुंडाशी बसतांना होणारी मनाची चलबिचल आणि मग अत्युच्च आनंदाचा क्षण! अंतरपाट दूर होताच! पण आपल्या बाबतीत तो क्षण आला असता का ? त्यावेळी श्री असता का आपल्या बरोबर ? छे. त्यापेक्षा आताचा हा क्षण फार फार मूल्यवान आहे. श्री आणि तो लटका सोहळा, श्री नाही तर सोहळा कसला ? श्री-माझा श्री-

तिनं मोठ्या अभिमानानं श्रीकडं पाहिलं. त्याच्या डोळयात सामावून जावे, त्याचे ते हंसरे डोळे, उत्साही डोळे. खरोखर किती भाग्यवान आहे मी !

आतुरतेने ती श्रीला जाऊन बिलगली. 'श्री ऽऽऽ' अस्फुट आर्त आवाज तिच्या तोंडून बाहेर पडला. श्री तिच्या कानाशी गुणगुणू लागला *'प्रीतम आन मिलो.'* ती सारं विसरून गेली. श्रीच्या मिठीत श्री बरोबर आपलं आयुष्य कसं उबदार आनंदात एकमेकाला आधार देत जाईल, नाही ? मिटल्या डोळ्यापुढं एकएक गोड स्वप्ने तरंगू लागली, सुखवू लागली. ती गुणगुणाऱ्या श्रीचा स्पर्श अनुभवीत होती. कोणीच बोलत नव्हतं. त्या कबुतराच्या जोडप्याला उगाचच वाकुल्या दाखवावसं वाटलं तिला. कसं मोकळं वाटतं नाही ! खूप बागडावं, मुक्त आनंदाचा आस्वाद लुटावा, आपलंहि छोटं घरकुल असेल जिथं श्री आणि मी याशिवाय कोणी नसणार. त्या कबुतरासारखे सर्वांपासून दूर.

''मालती ए मालती अगं ए मालती !'' मालती दचकली. वेगळा आवाज कानी आला व मिटलेले डोळे झटकन् उघडले गेले. समोर पहाते तो माधव. श्रीचा रूम पार्टनर, कावरी बावरी होत तिने चोहोकडे पाहिलं श्री-- श्री कुठं आहे ! ती आश्चर्यानं माधवकडे पाहू लागली. तिला काहीच कळत नव्हते.

''अशी काय बघतेस माझ्याकडे. अगं मी माधव, श्रीचा मित्र, मला ओळखलं नाहीस ?''

‘‘माधव तू तू कसा इथं ? श्री--श्री कुठं गेला --’’

श्रीचा शोध घेता घेता तिची नजर थकू लागली. माधव काही बोलेना. त्याच्या थंड चेहऱ्याकडे पाहण्याचा तिला कंटाळा आला. ती शांतता तिला खाऊ लागली.

कुठे आहे श्री ? एक असह्य आवाज स्तब्धतेत लहरी उत्पन्न करून गेला.

‘‘आता माझ्याबरोबर होता आणि--’’

‘‘ काय, श्री इकडं येऊन गेला ? काय वेड्यासारखे बडबडतेस मालती ? श्री तर’’ माधव थबकला. ‘‘सांगावे की नको ? ’’

‘‘म्हणजे ? ’’ मालती भांबावून गेली. ‘‘कुठंतरी उंचावरून जमिनीवर झेप तर घेत नाही ना मी ?

भावनेच्या भरात तिने घट्ट धरलेले खांदे सोडवत माधव म्हणाला ‘‘ माझ्या बरोबर चल ’’ ‘‘पण कुठे ? --’’ ती ‘श्रीला भेटायला ’ माधव म्हणाला.

‘‘अरे पण तो इथंच असेल कुठेतरी. आता तो आणि मी बरोबर होतो. आम्ही दोघांनी ठरवल्याप्रमाणं लग्न देखील केलं या मंदिरात.’’

‘‘वेड्यासारखं काय बडबतेस मालती. श्री--श्री इकडं येणं शक्य नाही !’’

‘‘म्हणजे ?’’

‘‘ तो सव्वानऊला मला रस्त्यावर भेटला आणि गडबडीत म्हणाला ‘मी कुलकर्ण्यांकडून पैसे घेऊन येतो. तू हार घेऊन ताबडतोब मंदीरात पोहोच ’ इतकं बोलून तो वळला आणि-’’

‘‘आणि माधव काय झालं पुढं ?’’ मालतीचा आवाज व्याकूळ झाला होता.

‘‘--आणि रस्त्याच्या मध्यभागी आल्यावर समोरून येणाऱ्या ट्रकखाली सापडून-’’

माधव एकदम थबकला. इतक्या लवकर आपण ही गोष्ट सांगायला नको होती. तो पहात होता. बधीर झालेल्या मालती समोर.

तिचा चेहरा पांढरा फटफटीत पडला होता. अंगाचं बर्फ झालं होतं. सारं रक्त कसं गोठत चाललं होतं. लाखो मधमाश्यांच उठलेलं मोहोळ गुणगुणत होतं सभोवताली. पापण्या निर्जिव झाल्या होत्या. अश्रूंचे थिजले बिंदू डोळ्यातच थबकले होते. पायाखालची जमीन सरकत होती जणू.

‘‘नाहीऽऽऽ!’’ तिनं किंकाळी फोडली. सारा परिसर ढवळून निघाला. झाडावरचे कवडे कर्कश चित्कार टाकीत उठले. त्या शांततेचा खून झाला.

‘‘ते-ते शक्य नाही’’ थरथरत्या ओठातून शब्द कसेबसे फुटत होते. ‘‘मला आता भेटला होता आणि असं कसं होईल ? शक्यच नाही.’’

‘‘तुला भास झाला असेल मालती- तो या जगातून दीड तासापूर्वीच गेलाय निघून’’

‘‘नाही ते शक्य नाही--’’

‘‘पण ते सत्य आहे मालती ’’

सारं आकाश तिच्या भोवती फिरू लागलं. ती वेड्या सारखी ओरडू लागली. ‘‘नाही. श्री आता येईल. मला एकटीला टाकून तो कधीच जाणार नाही. मी त्याची पत्नी आहे आता. तो मला सोडू शकणार नाही. तो येईल. आत्ता येईल.’’

भिजल्या डोळयांनी माधव तिला समजावीत होता. ‘‘परत घरी चल मालती. मी तुला न्यायला आलोय. तो आता कधीच येणार नाही.’’

‘‘नाही ऽऽऽ !’’ ती पुन्हा ओरडली. ‘‘मी येणार नाही परत. हा कट आहे सगळा. अण्णांना फितुर झालाय तुम्ही. श्री कुठेही असला तरी मला-त्याच्या पत्निला घेऊनच जाईल. तो येणार आहे. मी इथंच थांबीन त्याची वाट पहात..’’

‘‘जा- तू जा. तुम्ही सगळे दूर व्हा. सारे, सारे विघ्न-संतोषी आहात; मतलबी आहात. जा चालते व्हा. माझ्या नजरेपासून दूर व्हा.’’

तिला जोराचा ठसका लागला. सारे प्राण डोळयातील त्या अश्रूत न्हाऊन निघाले. वडाच्या पारावरती ती उन्मळून पडली. त्या भेदरलेल्या कबुतरांच्या जोडप्याकडं तिने पाहिलं आणि ती

सारं विश्व विसरली. अचंबित झालेल्या  माधवला विसरली. स्वतःला हरवून बसली. राहिली होती ती फक्त मिलनाची आसक्ति आणि त्या  आसक्तीत  डुंबणारी  मालती !

'स्वराज्य '( ३१ डिसेंबर, १९६६ )

# पराजिता

'लता, खरंच तू आत्महत्या केलीस ?' पण तिच्या प्रश्नाचं उत्तर तिला मिळत नव्हतं. 'लता, तू अशी एकटी टाकून गेलीस मला ! लतेच्या प्रत्येक आठवणी बरोबर भावनेच्या अंतरात आवर्त उठत होती. आईप्रमाणं माया करणारी लता, आता नव्हती या जगात. तिचा निश्चल देह भावनेच्या नजरेसमोरून हलतच नव्हता. तिच्या आयुष्यात निर्माण झालेली पोकळी तिला जाणवत होती.

एकलेपणाची वाळवी तिच्या मनाला खात होती. या मोठ्या शहरात लताचा आधार फार मोठा होता तिला ! जिवा-भावाची मैत्रिण ती हरवून बसली होती. नुकतंच वळण लागलेला आयुष्याचा प्रवाह अचानक आटला होता. आता हा नर्सिंगचा कोर्स नको ! आता हे हॉस्टेल नको ! लतेचा आधार तुटला तिथं राहून करायचं काय ? पण लतानं आत्महत्या कां केली ?

तिचे अश्रू हळूहळू थबकले. नैराश्याच्या खाईतून ती स्वत:ला वर आणित होती. एखाद्या गोष्टीचा अतिरेक झाला की मग ती गोष्ट आपल्याला नकळत नकोशी वाटते. आपण ती

टाळण्याचा प्रयत्न करतो. तिच्या डोळ्यातलं दुःख हळू हळू ओसरू लागलं, आणि तिथं अंगार धुमसू लागला. उन्मेष !

उन्मेष, तुझ्यामुळे लतानं आपल्या आयुष्याचं निर्माल्य केलं. एका सुंदर, कोमल, आणि सुवासिक फुलाला तू आपल्या निर्दयतेनं चिरडलंस ! गुलाबांच्या फुलांना चिरडून अत्तर तरी तयार होते. पण - या फुलाला चिरडून, कुस्करून तुला काय मिळालं? हे सांगशील मला ? तिच्या साऱ्या आशा-आकांक्षा मृत्युला अर्पण करण्यास भाग पाडलंस तू ! आपल्या मोहजालात गुंतवून आयुष्यातल्या सप्तरंगी जीवनाचं चित्र तू रेखाटलंस आणि त्याच चित्राला हसत हसत काडी लावलीस ती तूच ! उन्मेष ! ज्या मुलीनं तुझ्या चरणांवर सारसर्वस्व अर्पित केलं त्या मुलीला लग्नाला नकार देताना जरा देखील खंत वाटली नाही ? किती निर्लज्जपणे म्हणालास की -- 'मी फक्त प्रेम करण्यासाठी तुझ्याशी संबध ठेवले होते. लग्न वगैरे आपण नाही मानत'- नीच ! मतलबी !! नराधम !!!

तिच्या डोळ्यातील अंगार फुलत होता. लता आणि उन्मेषच्या पहिल्या भेटीपासून ते शेवटच्या भेटीपर्यंतचा प्रत्येक बारकावा लता तिला सांगत आली होती. सारी कहाणी तिच्या नजरेसमोरून सरकू लागली-

लतेची वेगवगळी रूपं तिला आठवू लागली. सुरवातीला दोन-तीन भेटीनंतर एकदा भावनेनं जेव्हा त्या दोघांना एकत्र भेटताना पकडलं तेव्हा लाजून आपण प्रेमात पडल्याची कबुली

देणारी लता ! प्रत्येक भेटीचा वृत्तांत लाजत, संकोचत, पण ऐकविल्याशिवाय न रहाणारी लता ! हळूहळू लग्नाच्या विषयाला सफाईनं कलाटणी देणारा उन्मेषचा जबाब घेऊन हिरमुसल्या चेहऱ्यानं परत येणारी लता! आणि शेवटच्या भेटीनंतर आपल्या खांद्यावर डोकं ठेवून फुटल्या आकांक्षांचा चुरा अश्रूंवाटे काढीत आपली व्यथा अस्पष्ट शब्दांत बडबडणारी लता- 'भावना, नाही ग शक्य ते ! मी त्यांच्या शिवाय राहू शकणार नाही मला विष दे. मला- मला खरंच जगू नयेसं वाटतं.'

- काल रात्रीची ही रडणारी लता, किती धीरानं मृत्यूला सामोरी गेली होती. लांबवर रेंगाळणारा मृत्यू तिनं घेतलेल्या झोपेच्या प्रत्येक गोळी बरोबर तिच्या जवळ जवळ आला आणि मग क्रूर हास्यात न्हाऊन तिचे प्राण घेऊन गेला आणि मग जगाच्या इतिहासात आणखी एक मृत्यू ची नोंद झाली. धक्काबुक्कीत, घाईगर्दीत, स्वतःभोवतीच्या अहं-वलयात फिरणाऱ्या त्या निर्लेप जगाच्या कार्यक्रमात काही बदल नव्हता. खंड पडला होता तो भावनेच्या आयुष्यांत ! जिवाभावाचं कोणी कायमचं सोडून गेलं होतं ते फक्त भावनेच्या संबंधात !

त्यात जगाला कसलं आलंय दुःख? उन्मेषला कसला आलाय शोक? उन्मेष! भावनेची ओळख उन्मेषशी लतानेच करून दिली होती. त्या नंतर ती कधीहि त्याला भेटली नव्हती. त्यामुळे त्याचं सांत्वन करणं मोठं कठीण होतं. त्याच्या आयुष्यात नैराश्य माजेल. एका नकारानं दोन जिवांच्या आयुष्याला वेगळं वळण लागलं. एका जिवानं तर त्या वळणांवरून भावनेच्या

हेलकाव्यात, मृत्यूच्या खाईत उडी घेतली, आता हा दुसरा जीव तरी हे दुःख पचवतो का हे पहायचंय.

भावनेला एकाएकी उन्मेषची कींव आली. त्याच्या बद्दलचा सुरवातीचा द्वेष, तिरस्कार हळूहळू विरघळला गेला आणि त्याची जागा अनुकंपेनं घेतली. एका दुर्दैवी जगाची जबाबदारी आता आपल्यावर आल्यासारखं तिला वाटू लागलं. त्याला सांभाळलं पाहिजे. कदाचित आपण समजतो तेवढा तो निर्दयी नसेल. त्याला समजून घेतलं पाहिजे. त्याचा जखमे वर  फुंकर घातली पाहिजे.

सकाळचे ११ वाजले होते.तिनं लगबगीनं उठून तोंडावर पाणी शिंपलं.  चुरचुरते डोळे थोडे निवले. कपडे बदलून ती होस्टेलच्या ऑफिसमध्ये गेली. घाबरत घाबरत तिनं उन्मेषच्या ऑफिसचा नंबर फिरवला‘ ! उन्मेषला फोन करण्याची तिची ही पहिलीच वेळ आणि तेहि अशा परिस्थितीत!

‘हॅलो कोण   बोलतेय?

‘उन्मेष स्पीकिंग’-- समोरून उत्तर आले.

‘मिस्टर  उन्मेष का ?  मी भावना बोलतेय. अं ऽ हो हो ऽऽ लताची  मैत्रिण.  तुम्ही  ताबडतोब  होस्टेलवर या.’

‘होस्टेलवर ! आत्ता ? सॉरी हं. जमणार नाही मला. मी फार कामात आहे.’

‘नाही, नाही; तुम्ही येणं अत्यंत जरूरीचं आहे. फोन वर सांगू शकणार नाही मी.’

‘पण काय काम आहे ते तर सांगाल? ‘

‘फोनवरच सांगू ? तुम्ही ऐकू शकणार नाही. फार वाईट घटना घडलीय इकडं. लतानं ....’ ती अडखडली. सांगावं की नाही? पण आता सांगणं अपरिहार्य होतं-- ‘ लतानं आत्मघात करून घेतला आहे.

तिनं झोपेच्या गोळ्या खाऊन आपला निरोप घेतला आहे!’ तिचा हुंदका उन्मेषनं ऐकला.

‘फार वाईट झालं. पण हे पहा , मी आता फार **Busy** आहे; तेव्हा मी नंतर येईन **O.K. ?**

भावना हतबुध्द झाली. तिला काही कळेच ना! असं कसं शक्य आहे? इतका संयम! याला संयम म्हणायचा की संयमाचं पांघरूण घातलेला निर्दयीपणा? भावनेच्या विचारांना धक्का बसला होता. अनुमानाला तडे गेले होते.

भावना आपल्या रूम मध्ये कॉटवर पडून होती. चार दिवस झाले. लताला जाऊन. तिच्या संगतीत काढलेले दिवस तिला एकामागून एक आठवत होते. अश्रूंची श्रध्दांजली वहाण्या शिवाय तिच्या हातात काही नव्हतं. चार दिवस झाले, पण उन्मेषचा पत्ता नव्हता. तिला उन्मेषच्या वागण्याचा अर्थच कळत नव्हता. जिनं एका पाषाणावर एवढं प्रेम केलं ती लता कुठं आणि आपल्या प्रियेच्या ( ? ) मृत्यूची वार्ता ऐकून एकदाहि होस्टेलवर न येणारा उन्मेष ! काय म्हणावं या स्वार्थी प्रवृत्तीला !

....अग, पण तो स्वतः जर या अपघातामुळं खचून घरी पडून असेल तर? पश्चातापाच्या अग्नीत स्वतः भाजून निघत असेल तर ?.... पण मग त्याला एकदा सुध्दा इथं येऊन जाता आलं नाही ? पण कोणत्या तोंडाने येईल तो? उलट सुलट विचारांच्या प्रवाहात सापडून ती वहात जात होती. भक्कम निर्णयाचा किनारा तिला सापडत नव्हता. आणी कितीतरी वेळ ती तशीच वाहत गेली असती, पण ऑफिसमध्ये तिच्या नावाचे फोन आल्याचा निरोप आला तेव्हा ती झटपट उठली, आश्चर्याच्या होडीत हेलकावे खातच तिनं रिसीव्हर उचलला.

'हॅलो कोण ? मी भावना बोलतेय' !'

'मी उन्मेष ' भावना क्षणैक थरथरली. एक अनामिक लहर तिच्या शरीरातून चमकून गेली. -' सॉरी हं! मी त्या दिवशी येऊ शकलो नाही. त्यानंतर मी जरा टूरवर गेलो होतो. आज सकाळीच परत आलो. आज संध्याकाळी वेळ आहे ना तुम्हाला ?'- तो थांबला.

अं ! हो ! '

''मग आज तुम्ही 'हॉटेल रेक्स' मधे या म्हणजे निवांतपणे आपल्याला बोलता येईल. कारण या परिस्थितीत मी तिकडे येणं प्रशस्त समजत नाही. तेव्हा तुम्ही ठीक पांच वाजता हॉटेलवर या. मी गेटच्या तिथंच वाट पहात असेन. न विसरता ठीक ५ वाजता. 'हॉटेल रेक्स' ! **O.K. ?** ''

तिला काहीतरी बोलायचं होतं पण ती बोलली नाही. ती या फोनच्या येण्यांने इतकी स्तिमित झाली होती, की काही

विचार करण्याच्या आतच तिला उन्मेषचे आमंत्रण मूकपणे स्विकारावं लागलं होतं. तिनं सुन्नपणे फोन खाली ठेवला.

म्हणजे आपण समजत होतो तसा काही तो दुःखी नाही. खरंच तो असा कसा? लता बरोबरचं प्रेम! प्रेम कसलं, नाटक सारं. छे, त्यानं खून केला लताचा. याचा जाब कुणाकडं मागायचा ? आहे या कायद्याच्या कलमात ती तरतूद ? अनेक बळी चढले असतील या नाटकापायी. आपण प्रेमात त्याला पागल करायच! सारं नाटक! तो वेडा झाला पाहिजे त्या पायी. लग्नाची मागणी घालील आपल्याला.! आणि आपण, त्यानं ज्या तुच्छतेनं लतेला लग्नाला नकार दिला होता त्याहीपेक्षा तुच्छतेनं त्याची मागणी धुडकावून लावू. -- आणि मग तो लाख विनंत्या करील-- पण त्याला हा धडा शिकवायचाच. बस. ठरलं !

संध्याकाळी मोठ्या उत्साहानं आणि स्थिर विचारांचं सामर्थ्य घेऊन हॉटेलवर गेली; दारातच उन्मेष निळसर सूट घालून उभा होता. हसत हसत त्यानं तिचं स्वागत केलं. दोघेहि न बोलता आतमध्ये शिरले. तिथला तो मंद प्रकाश, थंड वातावरण. सार कसं प्रफुल्लित वाटत होतं. कोपऱ्यातल्या एका टेबलावर ते दोघे बसले.

'हं बोला'-- तो म्हणाला, '--असं कसं झालं ?'

लतेच्या आत्मघाता विषयी तो विचारीत होता. पण दुःखाचा लवलेश नव्हता त्याच्या चेहऱ्यावर.

भावनेनं सर्व काही सांगितलं. तिच्या हुंदक्यांना देखील ती आवर घालू शकली नाही. लतेच्या आठवणीनं तिच्या जिवाची घालमेल झाली. उन्मेषनं मोठ्या सावधतेनं तिचं सांत्वन केलं.

'चालायचंच भावना, आता गेल्या व्यक्ति बद्दल दुःख मानण्यात काही अर्थ नाही. बरं, तुम्ही काय घेणार ?'

'मला काही नको.' भावनेनं विचारांच्या सुरांतील एक सप्तक छेडले.

'वा, वा, असं कसं चालेल ? कॉफी तरी घ्यायला पाहिजे.' त्यानं दोन एस्प्रेसो कॉफीची ऑर्डर दिली.

'तू अशी नर्व्हस का? ओ सॉरी मी तुम्हाला एकदम तू म्हणालो हं !'

'छे, तू म्हणालात तरी आवडेल मला. '

'ओ, थैंक्यू. तू अशी नर्व्हस राहिलीस ना की मग लतेची आठवण फार येते मला. तू जरा हस ना. मलिन विचार झटकून एका नव्या टवटवीनं फुलून नीघ ना! बरं हे सर्व साहित्यिक बोलणं जाऊ दे. तू आता मोकळी आहेस ना ? आज पिक्चरला जाऊ या छानशा.'

'पण आज मला नाईट ड्यूटी आहे.'

'ओ नो ! मग उद्या नक्की भेटणार ना मला ? आता आपण वरचेवर भेटत राहिलो तर दोघांचंहि दुःख हलकं होईल.'

भावनेच्या कानांत अजून उन्मेषचे शब्द रेंगाळत होते. उन्मेष बरोबर प्रेमाचं नाटक करायचं ठरवलं तर होतं तिनं, पण इतक्या झटपट उन्मेष पुढाकार घेईल याची तिला कल्पनाच नव्हती. त्याचं बोलणं फार लाघवी वाटलं तिला. पण लता नाही, लता, माझ्या निर्धारापासून मी ढळणार नाही. तुझ्या मृत्यूचा सूड घेणं माझं कर्तव्य आहे. मी हे सर्व फक्त तुझ्यासाठी करते आहे.

तिला असं का वाटू लागलं हे तिचं तिलाच कळत नव्हतं. स्वतःच्या नकळत ती उन्मेषकडे आकर्षिली गेली होती? तिला काही काही कळेना. अंतरीच्या त्या संघर्षाला तिथंच दडपून ती उन्मेषला भेटायला निघाली. एक कर्तव्य म्हणून प्रेमाचं नाटक करण्यासाठी !

भेट - पिक्चर- पुन्हा भेट - पुन्हा गावाबाहेर फिरणं- भेट- कर्तव्यासाठी भेट - कर्तव्यासाठी प्रेम- नाटक - सारं नाटक करीत होती ती. उन्मेषच्या प्रत्येक कृत्याला ती साद देत होती. तोहि आता भावनेशिवाय राहू शकत नव्हता. भावनेनं त्याच्यावर जादू केली होती. दोन भेटीमधील कालमर्यादा हळूहळू कमी होत होती. सारं आयुष्य बदलत होतं.

भावना उन्मेषकडे आपोआप ओढली जात होती. 'कर्तव्यासाठी एवढी जिवाची घालमेल' मग दरम्यानच्या काळात मनात होणारी ती हुरहुर ! ती कसली असते सांग भावना ! भेटी आधी वाढणारी हृदयाची स्पंदनं! ती कसली असतात. ती का वाढतात? सांग भावना ! अग तू स्वतःलाच फसवत आहेस. तू उन्मेषच्या प्रेमात पडली आहेस. तू कर्तव्याचं नाटक करीत आहेस; तुझ्या मनाला

तू चुचकारून शांत करण्याचा वृथा प्रयत्न करीत आहेस. लताच्या मृत्यूच्या सूडाच्या नावाखाली तू स्वतःला आसरा शोधीत आहेत. भावना! तू स्वतःशीच प्रतारणा करीत आहेस. भ्रमराला फुलाचं वेड कां लागतं ? पृथ्वीला सूर्याचं वेड कां लागतं ? ती त्याच्या ओढीनं त्याच्या भोवती कां रेंगाळते? भावना! भावना, तू ही उन्मेषच्या प्रेमात पूर्ण गुरफटली आहेस. तुझी न् तुझ्या उद्दिष्टांची केव्हाच फारकत झाली आहे. तू आता लतेची भावना राहिली नाहीस, तू उन्मेषची भावना झाली आहेस ! उन्मेषची !-

'नाही'-- भावना किंचाळून उठली. अंगाला दरदरून सुटलेला घाम, ते शरीरांचं कंपन, ती अपराधीपणाची जाणीव-- तिला काही कळेना.

'--नाही लता-- मी तुझ्याशी प्रतारणा करणार नाही. हे आता मी सगळं विचारीत होते ते माझं दुसरं मन. पापी मन. लता मी तुझ्यावरच्या अन्यायाचा बदला घेतल्याशिवाय राहणार नाही. तुला ज्या यातना भोगाव्या लागल्यात त्याच यातना उन्मेषला मी भोगायला लावीन बघ. त्याशिवाय मला चैन नाही पडणार.' अंतरीचं मन खुदकन् हसलं . 'करू शकशील हे वचन पूर्ण ? त्यानं सवाल केला. 'हो' - अनाहूतपणानं तिचा दुखावलेला अहंकार बोलून गेला.

ज्या क्षणाची ती आतुरतेनं वाट पहात होती तो क्षण आजच्या भेटीत आला होता. या क्षणी तिची मनीषा पूर्ण होणार होती. एक घाव आणि दोन तुकडे! मग ती हुरहुर नाही! ते नाटक नाही ! ते अवडंबर नाही ! लतेला जाऊन सहा महिने झाले होते. तिच्या मृत्यूचा शोक केव्हाच संपला होता. आता वेळ

आली होती ती त्या खुनाचा सूड घेण्याची. उन्मेष विचारत होता, 'बोल ना भावना; करशील ना लग्न माझ्याशी ? मला तुझ्याशिवाय हा जीवनकलह असह्य आहे. लतेला नकार दिला, त्या गुन्ह्याचं प्रायश्चित भोगण्याची संधी दे मला. माझ्या विस्कटलेल्या जीवनाची घडी आता तूच सावरू शकशील भावना-' उन्मेष भावनाविवश झाला होता. पण भावना ? घामानं ओलीचिंब झाली होती.

होकार की नकार ? तिला चटकन ठरविता येईना. ''वेडे, अशी संधि दवडतेस ? ज्याच्यावर तू खरोखरी प्रेम करतेस त्याला तू धुडकावून लावणार ? सारं जीवन वैराण वाळवंटात काढाव लागेल उन्मेषाशिवाय. आयुष्यात संधि फक्त एकदाच येते, लाभ घे तिचा ! नाहीतर पुन्हा कधीहि ही चूक सुधारता यायची नाही. लता तर गेली. तिनं काही सूड घ्यायला सांगितलं नव्हतं. उद्या तू उन्मेषशी लग्न केलंस तर कोणी तुला विचारणार नाही, की लतेच्या विश्वासघात का केलास म्हणून ? तू होकार दे. तुझ्या-शिवाय उन्मेषची अवस्था पण कशी होईल ? एका आगीतून होरपळून आसरा शोधत तो तुझ्याकडं आला आणि तू त्याला आता डागण्या देणार? नाही भावना, यातून उन्मेष वाचणार नाही. तोहि आत्मघात करील. त्याचं पाप तुझ्या माथी येईल. तू खूनी होशील. एका खुनाच्या पायी तू दुसरा खून करशील उन्मेषला नकार देऊन !''

'पण लता-' तिचं कर्तव्य खडबडून उठलं . 'नाही लता, तुला मी कसं विसरू? तुझ्या मृत्युच्या बदल्यासाठी तर एवढं नाटक केलं आणि मी आता मोहात गुरफटू ? नाही लता, नाही. मी नकार देणार ! भोगू दे त्याला यातना. माझ्या त्याच्या विषयीच्या

प्रेमाच्या भावना काही खऱ्या नाहीत; ते फक्त दाखविण्यासाठी. ज्या भावनाविवश परिस्थितीत त्याला मी आणलं आहे; ते सर्व या नाटकाचं फळ आहे. ते सर्व दांभिक प्रेम होतं लता. खोटं ! निखालस खोटं होतं ते !'

'बोल ना भावना ! देशील ना होकार ?' उन्मेषनं तिला हलवून जागं केलं, ती भिजल्या डोळ्यांनी त्याच्याकडें क्षणभर पहात राहिली. मग तिला जाणीव झाली, उन्मेष काय विचारतोय त्याची. मोठ्या मुश्किलीनं ती म्हणाली- 'उन्मेष तू मला विसरून जा. मी तुझ्याशी लग्न करू शकणार नाही.'-- भावनेला एकदम हलकं वाटू लागलं.

'भावना !' - उन्मेषच्या स्वरातील कंप तिला जाणवला.

तिनं स्वत:ला सावरलं. फार निर्धारानं तिनं आपलं बोलणं सुरू केलं. 'उन्मेष मी तुझ्यावर कधीच प्रेम केलं नाही. ज्याला तू प्रेम समजत होतास ते नाटक होतं. तुला धडा शिकविण्यासाठी केलेल नाटक. लतेला ज्या यातना भोगाव्या लागल्या त्या कशा असतील याची जाणीव तुला व्हावी म्हणून! स्त्री म्हणजे काय दोन घटकेचं खेळणं वाटलं तुला ? उन्मेष, स्त्री फक्त एकदाच प्रेम करते ! खरं प्रेम !! ते जर नाकारलं गेलं तर ती काय करू शकते? ते लतेनं दाखवून दिलं आहेच. पण त्याची जाणीव तुला नव्हती आणि ते सर्व विसरून तू माझ्याशी प्रेमाची लगट साधलीस. समजलास ! तू-तू खूनी आहेस ! आणि असल्या खुनी माणसाशी मी कदापि लग्न करायला तयार होणार नाही. जा, चालता हो माझ्या नजरेसमोरून आणि भोग आपल्या पापाची फळं !''

उन्मेषच्या डोळ्यांतून आश्चर्य ओसंडत होतं. अचानक बदललेल्या भावनेकडं तो दोन मिनीटं अनिमिष नेत्रांनी पाहत राहिला आणि मग तो एकदम हसला. खूप हसला. वेड्यासारखा हसला.

भावना बावरली. हा असं का करतो ? याला वेड बिड लागलंय कां ? का मी जे बोलले ते चेष्टेचं काढायचा प्रयत्न करतोय ? उन्मेष मधेच थांबला. अचानक ! आणि नेहमीच्या सुरात म्हणाला,'ठीक आहे भावना !' मी माझा विचार सांगितला; तू तुझा सांगितलास. तुझा लग्न करायचा विचार नाही ना ? ठीक आहे! प्रत्येकाला आपलं मत असतं. लतासारखा मूर्खपणा तू देखील करशील म्हणून मी आपण होऊन लग्नाचा विषय काढला. तू नकार दिलास. चला, चांगलं झालं ! कारण मी या विचाराचा माणूस आहे की जे काही होतं ते सर्व चांगल्यासाठीच होतं. अच्छा ! जपून रहा आणि लते सारखा अविचार करू नकोस ! गुड बाय !'

भावना बधीर झाली. अपेक्षाभंगाचा सुरा खोलवर रूतत गेला.

'उन्मेष' - ती ओरडली. तो केव्हाच निघून गेला होता.

पाहिलंस भावना ! तू हरलीस. स्वत:शी वेडी प्रतारणा केलीस. वास्तवतेला डावलून तू दांभिक कर्तव्याच्या मागे धावलीस ! सारं गणितच चुकलं. स्वत:चे आयुष्य तर उजाड करून घेतलंस पण त्याचं आयुष्य देखील बरबाद करू शकली नाहीस. भावना ! तुझ्या विजय होण्याच्या क्षणीच तू पराभूत झालीस भावना ! तू पराभूत झालीस !!

('माणूस' १३ जानेवारी, १९६८)

# अरू

'थँक्यू डॉक्टर' असे म्हणत हातातील बाटल्या डॉक्टरांच्या टेबलावर ठेवल्या आणि हातातील ती बॅग मी मिटून खाली ठेवली. आणि मग आम्ही दोघे खळखळून हसलो. डॉ अरूंधती देशमुख हसत होती अन् मी देखील हसत होतो. डॉ अरूंधती देशमुख तिचे ते हसणे. लहान मुलासारखे ते निरागस हास्य . कॉलेजमध्ये माझ्या वर्गात होती तेव्हा सुध्दा अशीच खुलायची ! अशीच उमलायची ! किती वर्षे झाली त्याला ? सहा वर्षे. छे, छे, आठ एक वर्षे तरी नक्कीच ! त्यावेळी तो आमचा इंटर-सायन्स चा 'बी' ग्रुपचा वर्ग आठवला की अजूनही सुखद आठवणी एकाएकी जमा होतात. वर्षा ऋतूतल्या ढगांसारख्या त्या एकामागून एक येतच रहातात. कोणी बोलविल्याशिवाय; आणि मग त्या आठवणीच्या ढगातून बरसते ती अनामिक आनंदाची संतत धार !

अरूंधती मेडिकल कॉलेजला गेल्याचे कळले. तिचे क्षेत्र वेगळे होते अन् माझे क्षेत्र देखील. ती एक डॉक्टर झाली होती आणि मी एका औषध कंपनीचा फिरता औषध विक्रेता- मेडिकल रिप्रेझेन्टेटिव्ह होतो मी. आणि ४-५ वर्षे हेच चालले

होते. सारखे फिरणे. मेडिकल कॉलेजात जाण्याची मनीषा काळाच्या थराखाली केव्हाच गाडली गेली होती. फक्त कुठल्या कुठल्या गावी वर्गमित्र भेटत, डॉक्टर म्हणून ! आणि मग मला त्यांच्या समोर आमच्या कंपनीच्या औषधाची जहिरात करावी लागे. निमूटपणे ते ऐकत आणि व्यवहारीपणाची बंधने तोडून जुन्या आठवणी निघत. इतर वर्गमित्रांबद्दल चौकशी होई. गप्पा झडत आणि पुन्हा एकदा त्या कॉलेज जीवनाचा आनंद चाखायला मिळाला तर काय बहार होईल, या विचारांनी मनाला उगीचच चकवा लागे. निदान ते इंटर सायन्सचे वर्ष तरी पुन्हा एकदा जगायला मिळावे, कोणत्याही किमतीच्या मोबदल्यात. ती नाटके, ती पिकनिक्स, वर्गातील ती धमाल, अरूंधती आणि माझ्याबद्दल उडणाऱ्या त्या वावड्या --- सारे सारे काही डोळयासमोरून चमकून जात असे.

जुन्या आठवणीनी एवढा नाजूक गोफ विणलाय असे वाटले नसते, पण माझी बदली पुण्याला झाली आणि अरू काणे ऐवजी डॉ. सौ. अरूंधती देशमुखना भेटण्याचा योग आला; आणि मग अंतरातील गोफ परत विणू लागला. एक एक आठवणीचे धागे किती मुलायम आणि तलम आहेत याचा अंदाज येऊ लागला. अरू बरोबर जुन्या गप्पा मारताना आगळ्या आनंदाची कारंजी उडू लागली.

‘किती दिवस मुक्काम आहे ?’- अरू विचारत होती.

‘आं’ - भूतकाळाच्या विचारातून हळूच डोके बाहेर काढीत मी म्हणालो, ‘आता आठवडाभर आहे मी इथंच ! नंतर परत

जाणार मी टूरवर ! आमचं काय, पायाला चाकं लागल्यासारखं असतं. आज इथं तर उद्या तिथं, डॉक्टर !'

''अशोऽऽक ! बघ, पुन्हा तू 'डॉक्टर' म्हणालास. मला तू तरी निदान डॉक्टर म्हणू नकोस. तू तरी निदान 'अरू' म्हण मला! सारा दिवस 'डॉक्टर, डॉक्टर' ऐकून माझं डोकं पिकतं.''

'अच्छा बुवा; अरू ! कशी काय प्रक्टीस ? मजेत आहेस ना तू ?'

तिच्या डोळ्यातील आनंदाची झालर चटकन् अदृश्य झाली. आंतरिक वेदनेची एक चमक तिच्या डोळ्यात उमटली, आणि मी मनाशी म्हणालो, 'चुकलो आपण.'

'चाललंय असंच !' त्या निश्वासाने मी अपराधी असल्याची जाणीव करून दिली. 'त्या अपघातानंतर सारं असंच चाललंय. घरी असलं की घर खायला उठतं. म्हणून मी शक्यतोवर हॉस्पिटल मधेच राहण्याचा प्रयत्न करतेय्. हा एकलेपणा नको वाटतोय, अशोक ! उबग आला रे !' भावनेच्या कल्लोळातील ते शब्द माझे अंतःकरण कापीत गेले. नको त्या विषयाला उगाच हात घातला होता मी. तिच्या मनातील दाबलेल्या विचारांच्या मधमाश्यांचे मोहोळ मी उठविले होते. डंख आम्हा दोघांना जाणवत होते.

तो अपघात ! डॉ. अजीत देशमुख यांचा अपघाती मृत्यू ! तो वर्तमानपत्रातील अपघाताचा फोटो! आणि नंतरची ती 'अरू' ची भेट. एका स्त्रिला होणाऱ्या पतिनिधनाच्या दुःखाबद्दल

तिचे सांत्वन करणारे शब्दच सापडत नव्हते मला. मी मूक होतो. अधून मधून बोलत होतो. 'अरू, धीर धर ! मरण काय कोणाच्या हातात असतं ? तू स्वतःला सावरले पाहिजेस !' मी किती तोकडं बोलत होतो हे माझे मलाच जाणवत होते. सहाच महिने संसारसुख लाभलेल्या स्त्रिला तिच्या साऱ्या आशा-आकांक्षांचा तुटलेला पेला पुन्हा सांधून देणे मला जमले नव्हते आणि जमले तरी कोणाला असते ? सहानुभूतीच्या चार शब्दांखेरीज माझे असे काहीच नव्हते, की जे मी तिला त्यावेळी देऊ शकलो असतो.

काळाची पाने एकामागून एक उलटत होती. मागील पाना-वरील आठवणी पुसट होत होत्या. प्रत्येक भेटीत मी तो विषय कटाक्षाने टाळत होतो, पण आज अचानक माझ्या हातून तो प्रमाद घडला होता. मी कावराबावरा झालो होतो.

'टेक इट ईझी !' तुला दुखवण्याचा माझा हेतू नव्हता, अरू !

डोळ्यातील वेदना लपवीत ती म्हणाली, 'जाऊ दे अशोक ! एखाद्याच्या आयुष्यात जर हे असंच जगणं असेल तर त्याला कोण काय करणार ?'

जीवनाविषयीची उदासीनताः सारा विषाद, एकलकोंडेपणाची जाणीव; हे सारे सारे क्षणकालच तिच्या चेहऱ्यावर उमटून गेले. एकच क्षण ! त्या नंतर होती शांतता, वादळानंतरची शांतता ! उद्रेकानंतरचा हलकल्लोळ कुठेही दिसत नव्हता. दिसत होता तो संन्यस्त कातळासारखा शांत चेहरा. आतल्या घालमेलीची पुसटशी देखील शंका न येऊ देणारा !

‘किती वाजता बाहेर निघणार आहेस तू ?’ विषयाला कलाटणी देण्याचा माझा वृथा प्रयत्न !

‘मी निघालेच होते घरी, एवढ्यात तू आलास! चल येतोस घरी ?’

‘अच्छा. मी उठलो आणि तिच्या मागोमाग बॅग घेऊन बाहेर पडलो. पार्किंग लॉटमधून गाडी घेऊन ती पोर्चमध्ये आली न् मी आत बसलो. गाडी संथपणे आपला नेहमीचा मार्ग आक्रमू लागली. संभाजी पुलावरून एरंडवण्याकडे गाडी वळली तरीही आम्ही कोणीच बोलत नव्हतो. गाडी एका बसक्या टुमदार घरापुढे थांबली.

आम्ही दोघे आत आलो आणि दिवाणखान्याच्या त्या प्रशस्त सोफ्यावर मी बसलो. ती कपडे बदलण्यासाठी आत गेली. आणि टीपॉयवर पडलेले एक नियतकालिक मी चाळू लागलो. कपडे बदलून ती बाहेर आली आणि म्हणाली, ‘हं, काय म्हणतात वहिनी ?’

‘काय म्हणणार ?’ हातातील नियतकालिक शक्य तेवढ्या कमी त्वेषाने मिटत आणि चेहऱ्यावर उसने हास्य आणित मी म्हणालो. ‘दोन महिने मुंबईलाच गेलो नाही.’

अरे आजचा पेपर वाचलास का ? ती एकदम उत्साहाने म्हणाली.

‘नाही बुवा; वेळच नाही मिळाला अजून. का काही विशेष?

'अरे, वहिनीच्या चित्रांच्या प्रदर्शनाचं बरंच कौतुक केलंय पेपरमध्ये.' असे म्हणत तिने बाजूला पडलेला पेपर माझ्या हाती दिला आणि प्रदर्शनाचा वृत्तांत ती मला दाखवू लागली. तिच्या उत्साहावर पाणी फिरवण्याचा माझा मुळीच हेतू नव्हता, पण तिच्या उत्साहाइतक्याच तीव्रतेने मी तो पेपर थंडपणे बाजूला केला आणि म्हणालो.

'माहीत आहे मला तिची चित्रकला ! अरू एक सांग मला, माणसांन एखाद्या गोष्टीच्या मागं कितपत वेडं व्हावं ? तिची चित्र चांगली असतात, ती पट्टीची चित्रकार आहे. सर्व कबूल; पण मी म्हणतो, एखादी गोष्ट मर्यादेपलींकडं जाऊ देणं कितपत योग्य आहे ? अरू, या चित्रकलेनंच माझ्या आयुष्याची राखरांगोळी केलीय! चित्रकलेशिवाय दुसरं काही सुचत नाही तिला! टूरवरून दोन तीन दिवसांसाठी घरी आलो तरी हिच आपलं चित्रकलेचं कौतुक ! आज हे पोर्ट्रेट पूर्ण केलं, तर उद्या त्याच स्केच कंप्लीट केलं ! आज या मिटींगना, तर उद्या त्या प्रदर्शनाला भेट. तिच्या मुंबईत रहाण्याच्या हट्टामुळे पुण्याला बिऱ्हाड करण्याचा विचार आला पण तसाच सोडून द्यावा लागला. या सर्वात माझ्या मुलीचे हाल पहावत नाहीत मला. त्या चित्रकलेच्या दुनियेनं तिच्या आईला खाऊन टाकलंय आख्खं! त्या पोरीची कणव येते न् मग मनात नसतांना देखील मुंबईला जावं लागतं. आई-बाप असून पोरक्या झालेल्या त्या मुलीसाठी म्हणून ! निरागस मुलांच्या आयुष्यात आई-बापांच्या प्रेमाचं महत्व मला किती तरी वाटतं हे तुला माहीत आहेच, अरू !

‘अशोक-,’ भांबावलेल्या नजरेने तिने माझ्या खांद्यावर हात ठेवला अणि मला एकाएकी भडभडून आले. पण असे चालणार नाही, आवरले पाहिजे स्वतःला. भावनाविवश होऊन रडण्याचे वय नाही हे! वयाबरोबर सुख-दुःखांच्या कल्पनाही बदलतात. बालवयातील तीव्र दुःखे मोठेपणी व्यक्त करता येत नाहीत. सारे सारे विसरल्याचे नाटक करावे लागते. आतापर्यंत असा उद्रेक कधी झाला नव्हता. आणि मग आताच एकाएकी असे अश्रू ! हा त्या स्निग्ध स्पर्शाचा परिणाम काय? नाही. दूर राहिले पाहिजे यापासून. सारा बंध कोसळतो आहे त्या आपुलकीच्या स्पर्शाने. सारा संयमही कोसळेल.

मी एकाएकी हसलो. मला कळत होते की माझ्या डोळ्यात उमटलेली भावनांची प्रेते लपवण्याचा मला फार त्रास होतोय, तरीही कसाबसा तिला म्हणालो,

‘अरे, म्हणजे कमाल आहे ! पाहुण्यांना चहा वगैरे काही देणार की नाही ?’

‘अरे हो ! विसरलेच. कॉफी करते वेलदोडे टाकून. तुला आवडते ना ?’

‘येस. ऑफ कोर्स ! दॅटस् व्हेरी नाईस ऑफ यू !’

ती लगबगीने स्वयंपाकघरात गेली. तिच्या यौवनातील अल्लडपणा, चालण्यातील सहजता, अजूनही सारे काही तसेच होते. पण काय काळाने खेळ खेळला होता तिच्याशी ! तिच्या आयुष्याशी ! सारे आयुष्य असे एकलेपणाने जगावे लागणार तिला. मी सुध्दा काहीच करू शकत नव्हतो.

कॉफीचा कप तिने माझ्यासमोर धरला तरी मी तिच्या विषयीच विचार करीत होतो.

'काय महाराज ? कुठे समाधी लावलीय एवढी ?' 'अं?

काही नाही. सहज विचार करीत होतो, तुझ्याविषयीच ! अरू, एक सुचवू का तुला ? राग येणार नाही ना ?'

'छे, बोल ना.'

'तुला असं एकटं रहाण्याचा कंटाळा येत नाही ? या एवढ्या मोठ्या जागेत राहवतं कसं तुला ?'

'असंच' - तिचा आवाज पुन्हा खोल गर्तेत गेल्यासारखा वाटला. तिच्या आवाजातील कातरता मला स्पष्ट जाणवली. 'म्हणजे ? तिने विचारले.

बोलावे की नाही अशा द्विधा मनःस्थितीत मी निर्णय घेतला की आता विषयाला सुरवात केली आहे तर बोलून टाकावे.

'तू-तू दुसरं लग्न कां करीत नाहीस ?' 'अशोक!' आवाजातील तीव्रतेची सुरी सारी शांतता कापीत गेली.माझ्या हृदयाचा ठोका चुकला.

तिच्यावर असा अनपेक्षित आघात होईल असा माझा कयास होताच. मी म्हणालो, 'होय अरू, मला तुझं दुःख पाहवत नाही. हे असे एकलकोंडे आयुष्य जगण्याचा कंटाळा येईल तुला. साऱ्या आयुष्यात आपल्या मायेचं, हक्काचं कोणी असल्याशिवाय जीवनाचे रंग लुटण्याची मौज तुला मिळणार नाही.'

'अशोक, तू-तू हे सांगतोस मला? तू काय सुख मिळवलंस संसार थाटून ?'

माझ्या जखमेची खपली पुन्हा निघाली होती. मी स्वतःला सावरले.

'माझी गोष्ट जाऊ दे. मला त्याची संवय झालीय !'

मलाही एकलेपणाची संवय नाही का होणार ?'

'हे बघ, असं भलतं सलतं काही बोलू नकोस. तू डॉक्टर आहेस. हॉस्पिटलमध्ये पेशन्टस्च्या दुःखात स्वतःला विसरून त्यांना आनंदाच्या आकांक्षेतील सुखद अनुभूतीला पारखे होण्यापासून वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न करशील, त्यात यशस्वी देखील होशील, पण ते पेशन्टही निघून जातील. आणि तू फक्त एकटी राहतील. तुझ्याजवळ राहतील ते फक्त त्यांच्या आभाराचे शब्द. दुसरं काही नाही. या शब्दांवर जगणं फार कठीण आहे. कौतुकाचे शब्द एखाद्याला क्षणभर आनंद देऊ शकतील; नाही असं नाही; पण त्यांचाच आधार घेऊन हे जीवन जगणं वाटतं तितकं सोपं नाही.'

'अशोक' ती माझ्याकडे पाहत म्हणाली. तिच्या डोळ्यात एक वेगळीच चमक मला जाणवली. ती काहीतरी वेगळेच बोलणार आहे असे मला वाटून गेले.

'अशोक ! तू एवढं समजवतोस ! एवढा माझा विचार करतोस तुला स्वतःला या गोष्टी कितपत लागू पडतात याचा विचार

तू केलायस! तुझी पत्नी! नावाची पत्नी! फक्त नवरा म्हणून तुझा उल्लेख करण्याइतपत तुझा तिचा संबंध !'

'अरू'-

'नाही अशोक, मला बोलू दे ! थांबवू नकोस मला ! काय दिलंय तिनं तुला ? बायकोचं प्रेम देऊ शकलीय तुला ? स्वतःच्या अहंपणाची एवढी घमेंड असेल तर गृहिणी होण्याचं नाटक करून एखाद्याच्या संसारसुखाला मूठमाती देण्याचा काय अधिकार आहे तिला ? तू-तू घटस्फोट का घेत नाहीस ?'

'घटस्फोट ?' मी एकदम दचकलो. या शब्दाची तिच्याकडून मी मुळीच अपेक्षा केली नव्हती.

'हो-हो तू घटस्फोट घेतलास तर-' तिचा आवेश एकाएकी नरमला. अंतरीचा संघर्ष तिला पुढं बोलू देत नव्हता. पण एकाएकी तिचा चेहरा करारी झाला. निश्चयाच्या भावनेने तिचे सारे शरीर पुढे झुकले आणि ती म्हणाली,

'अशोक, तूच माझ्याशी का नाही लग्न करीत घटस्फोट घेऊन !'

'अरू'- आता माझा संयम तुटू पाहत होता. एका मागून एक असे धक्के बसत होते. घटस्फोट ! पूर्वी याचा विचार केला नव्हता का ? पण मी दुबळा होतो मला ते जमले नसते. समाजाची का कोणास ठाऊक एक भिति वाटत होती. छे ! समाजाला कशाला घाबरेन ? काही केले तरी समाज बोलणार ते बोलणारच, मग ?

सुषमा माझी एकुलती एक मुलगी ! तिचा विचार येऊनच नेहमी आपण घटस्फोटाचा विचार दूर सारत आलो. घटस्फोटानंतर सुषमाच्या जीवनाच्या कल्पनेने देखील आपण घाबरून जात असू.

उल्काची जळजळीत वाक्ये अजूनही मला आठवत होती. 'सरळ सांगा ना तुम्हाला माझा उत्कर्ष बघवत नाही म्हणून ! असूया वाटते ना माझ्याबद्दल ? सुषमाचं निमित्त करून मला तुम्ही चुलीपुढची मोलकरीण बनवण्याचा प्रयत्न करताहात; पण सांगून ठेवते की मी अशी बधणार नाही. तुम्हाला आवडत नसेल तर माझ्या व्यवसायात उगाच ढवळाढवळ करू नका. माझ्या चित्रकलेची सारा रसिकवर्ग वाहवा करतोय हे पहावत नाही तुम्हाला.' सारे सारे मला आत्ताच घडल्यासारखे आठवत होते. उल्कापासून दूर पळावे. घटस्फोट घ्यावा. पण मग समाज! त्याचे काही नाही. पण सुषमा ? त्या बिचारीचे कोण हाल होतील माझ्या नि उल्काच्या भांडणात. त्यापेक्षा आहे तेच चालू देण्या-शिवाय गत्यंतर नाही.

'का अशोक, गप्प का बसलास असा ?' ती म्हणाली . मी चमकून अरूकडे पाहिले, आणि न बोलता घाम पुसू लागलो.

'मला माहीत आहे अशोक तू घटस्फोट घेऊ शकणार नाहीस. इतकी खात्री होती म्हणूनच तुला मी विचारलं माझ्याशी लग्न करण्याविषयी. असा बावचळून जाऊ नकोस. हे बघ, अजीत बरोबर मी सहाच महिने संसार करू शकले पण त्या सहा महिन्याच्या ज्या जुन्या आठवणी आहेत ना, त्या मला आयुष्यभर पुरतील. त्या

आठवणीवर मी सारं आयुष्य काढू शकेन एवढं मनोबळ आहे माझ्याजवळ. आणि पुन्हा लग्न करण्याचा विचार माझ्या मनी कधीच येणार नाही. अजीतच्या आठवणी एवढ्या आहेत की, मी एक एक आठवण फार हळूवारपणे काढते. खूप खेळते. त्या आठवणी बरोबर ! कधी कधी रडते ! मग पुन्हा नीटपणे ती आठवण मनाच्या कप्प्यात ठेवून टाकते. कळलं अशोक, हे आयुष्य कसे जगते मी ते !'

मी मूढासारखा उभा होतो. असं कसं शक्य आहे ? अरू असं कसं आयुष्य काढू शकेल ? मग तो विषाद क्षणभरच डोळ्यांत डोकावून जाणारी उदासीनता ती कसली ? मला कळेना काही. एवढे तिने सांगितले मला, पण मला पटेना. इतकं दुःख पचवणारी 'अरू' मला माहीत नव्हती. नाही पण -

'अरू' - मी तिच्या नजरेस नजर भिडवून म्हणालो,'खरं सांग, जगू शकशील तू हे आयुष्य त्या आठवणीवर ? माझे डोळे तिच्या डोळ्यांत चाचपडत होते. आत्मविश्वासाची चमक तिथून एकाएकी निघून गेली आणि त्या जागी दोन अश्रू हळूच आले. आणि मला माझे उत्तर मिळाले !

'माणूस' ( फेब्रुवारी १५, १९६९ )

# शिल्प

*‘रसूल मियाँ, यार इतने दिन हो गये तुम्हारे हैद्राबाद में आके, मगर अपना दिल नही लग रहा’* - मी सिगरेट पेटवत रसूलला म्हणालो. रसूल आमच्या कंपनीचा हैद्राबादचा एजंट होता आणि वरिष्ठ अधिकारी या नात्यानं मला असे प्रथमच हैद्राबादला यावं लागलं होतं. गेल्या तीन चार दिवसांच्या वास्तव्यात रसूल बरोबर बरीच मैत्री झाली होती. हैद्राबादचे वास्तव्य एकंदरीत या उन्हाळ्याच्या दिवसांत चांगले जाईल असे वाटले होते पण गेले दोन दिवस शहरात एकंदरीत तंग वातावरण होते. हरताळ, कर्फ्यू, गोळीबार यांची एका मागोमाग एक अशी सरबत्ती चालली होती. बाहेर कुठं पडवत नव्हतं आणि लॉजमध्ये उगाच पत्ते खेळत बसण्याचा मला अगदी कंटाळा आला होता.

रसूलनं माझ्याकडं प्रश्नार्थक मुद्रेनं पाहिलें आणि मी विचारलेल्या प्रश्नातील खोच त्याच्या चटकन् लक्षात आल्याचं दिसलं. तो म्हणाला, ‘बॉस, आप भी आये तो ऐसे वख्त; जब की पूराहैद्राबाद जल रहा है। शायद कल तक ये झमेला ठंडा हो जाय तो आपको ले चलूँगा।’

आणि दुसऱ्या दिवशी रसूलने सांगितल्याप्रमाणे वातावरण बरेच शांत झाले होते. नियमीत कार्यक्रमाला सुरवात झाली होती.

दहाच्या सुमारास रसूल म्हणाला, 'बॉस, आज सब ठीक लग रहा है; आज शामका खाना आप मेरे साथ लेंगे और उसके बाद हम चलेंगे ।

दिवस कामात कसा व्यतीत झाला काही कळले नाही. संध्याकाळी रसूलच्या घरी पोहोचलो तर जेवणाचा स्पेशल बेत. हैद्राबादी जेवणाची खास योजना होती. घोरपड बनवली होती रसूलमियाँनं. खास हैद्राबादी मध्ये त्याला 'उडमू' म्हणतात. *'वा ! रसूलमियाँ इस उडमू ने तो पेटके साथ दिल भी भर दिया'* – मी खूष होऊन म्हणालो.

*'बॉस दिल उडमूसे तो नही भरेगा । दिलको भरने के लिये तो अब जा रहे है ।'* रात्र बरीच झाली होती. रात्रीचे ९-९॥ वाजले होते. जेवणाच्या मस्त कार्यक्रमामुळे एक मस्त प्रकारची धुंदी चढली होती. हैद्राबादमधील दिवसाचा उन्हाचा ताप भरपूर असला तरी रात्री सुटणारे गार वारे अंगात काही न्यारीच लहर उत्पन्न करून जात होते.

दहाच्या सुमारास रसूलने त्याची फटफटी बाहेर काढली आणि आम्ही सुसाट वेगानं चारमिनारच्या दिशेने निघालो. गार वारे अंगाला झोंबत होते. सगळीकडे जवळ जवळ सामसूम झाली होती. जुन्या हैद्राबादच्या त्या कलात्मक इमारती हळूहळू जवळ येऊ लागल्या. चांदण्यात त्यातील काही इमारती जवळ कळस तळपत होते ! दिपवत होते ! फक्त अंतरातील विचारांना.

आणि त्या जगप्रसिध्द चारमिनारला वळसा घालून पुढच्या गल्लीत जाता जाता चारमिनारच्या त्या उंचावर असलेल्या कळसांनी देखील चांदण्याचा वर्षाव करून माझं स्वागत केल्याचं डोळे भरून पाहिलं. एका बैठ्या इमारतीसमोर आमचे वाहन थांबले. रसूल आणि मी दोघेही त्या इमारतीत शिरलो. रसूल इथे नेहमी येणाऱ्या पैकी होता हे निश्चित. त्याच्या मागे मी दोन तीन दालने सोडून आत गेलो आणि अवाक् झालो. बाहेरून जुनाट वाटणाऱ्या इमारतीमध्ये एवढ्या राजेशाही थाटानं सजवलेला कमरा असेल याची जरा सुध्दा कल्पना आली नव्हती मला. आम्ही खास लोड-तक्क्याच्या बैठकीला टेकून बसता बसता त्या दालनातलं वैभव न्याहळलं. शाही झुंबरे ! एका भिंतीवर बऱ्याच मोठ्या प्रमाणात चित्रीत केलेलं एका सुंदर तरूणीचे तैलचित्र. दारावर, खिडक्यांवर बारीक बारीक नक्षीकामांनी आणलेली शोभा; दालनात चोहोबाजूला लावलेल्या मोगऱ्याच्या माळा. या मोगऱ्याच्या वासाने मी बेफाम झालो होतो. *बस ! यार आज तो मजा आयेगा* ' मी रसूलला म्हणालो देखील.

बाजूच्या प्रवेशद्वारातून एक गौरांगिनी हातात दोन गजरे घेऊन आली आणि आमच्या हातात बांधून गेली.

रसूल म्हणाला, *'क्या बॉस , कुछ पीनेकी ख्वाहीश ?'*

*'नही मियाँ, हम तो कानों से पीने के लिए आये है । शराबसे भी गहरा नशा असली चीजे सुननेमें है ।'*

'महफील'चा सर्व 'इन्तजाम' झाला. तब्बलजी, सारंगीवाले सारे सज्ज होते. आणि इतका वेळ इंतजार असलेल्या त्या गोड गळ्यानं दालनात प्रवेश केला.

*'यही है सुरोंकी शाहजादी बेगम अशरफ'* रसूल माझ्या कानात कुजबुजला. तिने समोर येऊन कुर्निसात केला; आणि मी तिच्याकडे पाहतच राहिलो. सारं आसमंत, ते दालन, ती नक्षीदार झुंबरं माझ्याभोवती फिरताहेत असं वाटलं. माझा माझ्या डोळ्यावर विश्वास बसेना. हीच का 'ती ?' चेहऱ्या चेहऱ्यांमध्ये साम्य असू शकतं, पण इतकं? नाही ही तीच! माझ्या कपाळावर धर्मबिंदू जमा झाले. तिथल्या वातावरणाची धुंदी खाडकन् उतरली. तिनं माझ्याकडं पाहिलं. प्रथम आश्चर्यानं. नंतर बराच वेळ टक लावून पहात राहिली. तिनं मला ओळखलं होतं. त्या ओळखीची झांक मी क्षणभरच तिच्या डोळ्यांत वाचली. पण क्षणभरच ! पण त्यानंतर ते डोळे वेगळेच दिसू लागले. एखाद्या धंदेवाईक गाणाऱ्या बाईसारखे. त्या क्षणभराच्या दृष्टीक्षेपात मी त्या डोळ्यातील आणखी एक छटा टिपली होती. घृणेची! रागाची! धुत्काराची! माझ्या रक्तवाहिन्या शुष्क झाल्यासारखं मला वाटू लागलं.

तिनं सारंगीवाल्याकडं एका खानदानी 'अदा' नं पाहिलं आणि त्या निर्जीव वाटणाऱ्या वाद्यातून सूर उमटले. मधुर, धुंद वातावरणात कैफ भरणारे सूर आणि त्या मागून आलेली तिची तान. अगदी लाडिक-

*'मेरे आरजूकी कहानी बनी है।*
*मेरे दिलकी धडकनोंकी यादे चुनी हैं॥*
*आधी हकीकत और आधा है सपना।*
*न पूछो मेरे दिलसे दिलका तडपना॥'*

ती गात होती. माझ्याकडे पाहून गात होती. पण मला त्यात रस वाटेना. इथून जावे. पळावे, फार फार दूर जावे. पाण्याबाहेर काढलेल्या माश्यासारखी माझ्या मनाची अवस्था झाली होती. नाव बदलले होते तिचे ! बेगम अशरफ ! पण ती बदलली नव्हती. निदान मी तरी निःशंक होतो माझ्या अंदाजाविषयी. आणि तिच्या डोळ्यातील एकामागून एक दिसणाऱ्या छटा माझ्या अंदाजाला बळकटी देऊन गेल्या होत्या. माझी आता खात्री झाली होती. ललिता ! हो तीन वर्षापूर्वी भेटलेली ललिता. एक निरागस दिसणारी सौदर्यवती. आज माझ्यासमोर बेगम अशरफ म्हणून बसली होती. एक कोठीवाली म्हणून ! माझं दिल बहलवण्यासाठी, थोड्या नोटेच्या खातीर; तिनं बाजार मांडला होता. माझं मन ललिताला पहात होतं. नजरेसमोर बेगम अशरफ होती, तरी माझ्या अंतर्मनानं ललिताला बोलावलं. भूतकाळच्या त्या आठवणी एकामागून एक सरकू लागल्या.

पुण्याहून बार्शीला चाललो होतो. औषधांचा एक फिरता विक्रेता होतो मी. माझ्या शेजारच्या जागेवर एक तरूणी येऊन बसली. एकटीच होती. थोडी बावरलेली आणि निरागस देखील. मी प्रवासात आपणहून तिच्याशी काहीच बोललो नाही. तीच म्हणाली 'गाडी किती वाजता पोहोचते हो बार्शीला ? '

'रात्री ९ वाजता' - मी म्हणालो.

आणि तिच्या चेहऱ्यावर बारीकशी शंका आपलं अस्तित्व दाखवून गेली. तीन चार तासांचा प्रवास अजून राहिला होता. ती

देखील शांत बसून बसच्या प्रवासाला कंटाळलेली वाटली. मी हातातील पुस्तक बंद केलं आणि ती काही बोलेल या अपेक्षेनं तिच्याकडं पाहिलं.

'तुम्ही बार्शीचेच कां ?' - ती म्हणाली.

'नाही. मी पुण्याचा. कामासाठी बार्शीला चाललोय्. तुम्ही खुद्द बार्शीच्याच का ?'

'हो पुण्याला मैत्रिणीकडे गेले होते.'

- मग ती पुढे बोलतच राहिली. तिच्या बोलण्यावरून तिच्या घरी ती एकटीच होती, हे कळलं. आई-वडिल तिच्या लहानपणीच वारले होते. आणि लहानपणापासून ती तिच्या चुलत्याबरोबर रहात होती. मॅट्रीक झाल्यानंतर टिचिंग डिप्लोमा घेऊन ती बार्शीला शिक्षिका होती शाळेत. तिच्या एकंदरीत बोलण्यात नैराश्याची झाक दिसून येत होती. तिच्या संथ सरोवरा-सारख्या दिसणाऱ्या चेहऱ्यावर निराशेचे तरंग प्रत्येक विचारागणिक उठत होते आणि ते तरंग विरण्याच्या आत पुन्हा एखादा विचाराचा खडा पडत होता. आणि पुन्हा ते तरंग उठत होते . ती बोलत होती. मी शांत होतो. आतमधली धगधग संपवायची होती तिला. मनात खूप दिवसांपासून साठवून ठेवलेलं सारं काही बाहेर काढण्याचा प्रयत्न चालला होता. मला आश्चर्य वाटत होतं. तिन माझ्यासारख्या सहप्रवाशाला एवढं का सांगावं ? एवढ्या विश्वासानं ? एवढ्या आपुलकीनं ?

बार्शी स्टेशनवर बस आली आणि ती मला म्हणाली, 'तुम्ही मला माझ्या खोली पर्यंत पोहचवणार का ?

मी अवाक् झालो. रात्रीच्या या वेळी एका अनोळखी इसमाला ही तरूणी आपल्याबरोबर चलण्याचा आग्रह करते हे पाहून माझं मन शंकेन डवरलं. पण विचार केला, काय हरकत आहे ?

माझं नेहमीचं उतरण्याचं ठिकाण म्हणजे लॉज. ते जवळच होतं. लॉजमध्ये जाऊन मी सामान ठेवून आलो. ती माझ्याबरोबरच होती. लॉजमधून बाहेर पडता पडता ती मला म्हणाली, 'मला या लॉजमध्ये रहाता येईल का ?'

मी चमकून तिच्याकडं पाहिलं. 'म्हणजे ? तुला तुझ्या रूमवर जायचं आहे ना ?'

'तुम्ही चला माझ्या बरोबर; मला तुमच्याशी बोलायचे आहे.'

मला कळेना. रात्री दहाची वेळ, त्यांत प्रवासाचा थकवा.

'पलीकडं एक बाग आहे, तिकडं चला. कोणी असणार नाही आता तिथं. चला तुम्हाला काही सांगायचं आहे.'

नाना शंका-कुशंका माझ्या मनात डोकावल्या. परकं गांव, अनोळखी स्त्री आणि त्यांत अशी ही अवेळ !

चालत चालत बागेच्या फाटकापाशी आलो. फाटक बंद होतं. बाहेरच्या बाजूला एक चौथऱ्यावर आम्ही बसलो, आणि ती म्हणाली, 'मी तुम्हाला बसमध्ये सांगितलं ते सर्वच काही खरं नव्हतं.'

मी गुढतेने तिच्याकडे पाहिले. तोंडावाटे एकहि शब्द निघाला नाही. जे काही सांगायचं ते डोळे सांगून गेले.

‘मी खरोखरच एक अनाथ तरूणी आहे. माझं शिक्षण पण तुम्हाला सांगितलंय्  त्याप्रमाणं झालं आहे. मी इथंच  एका शाळेत शिक्षिका होते. पण माझा चुलता माझ्या जिवावर उठलाय. मला त्याने मारायचा चंग बांधलाय्. त्याच्या म्हणण्याप्रमाणें मी वागायला पाहिजे म्हणे. आठ दिवसांपूर्वी त्यानं मला दुधातून विष देण्याचा प्रयत्न केला. वेळीच कळलं म्हणून वाचले. आणि त्याच दिवशी इथून पुण्याला पळून गेले. माझ्या जवळचे दोन चार कपडे  घेऊन. तिथं एका मैत्रिणीच्या घरी राहिले. पण किती दिवस रहायचं असं ? मला माझी व्यवस्था आता केलीच पाहिजे. बार्शीला परत आले ते माझ्या पगाराचे पैसे  घेण्यासाठी म्हणून.  त्या आधारावर मी थोडे दिवस तरी ढकलू शकेन. मी इथं आहे एवढं जरी माझ्या चुलत्याला कळलं तरी माझी धडगत नाही. मला – मला तुमची मदत पाहिजे. तुम्ही मला पुढचा मार्ग दाखवा.’

तिच्या डोळ्यातील अश्रू  खाली ओघळत होते. मी सुन्न होतो. ‘तुम्ही मला सज्जन वाटलात म्हणून मी तुम्हाला इतका त्रास दिला.

एखादी अरबी सुरस कथा ऐकल्यासारखे माझ्या चेहऱ्यावरचे भाव वाचून ती म्हणाली, ‘शप्पथ, तुमच्या पायाची, खरं सांगतेय् मी !’  एवढ्या आपुलकीनं मी बावचळून गेलो. मी तिला म्हणालो, ‘मी काय करावं असं तुला वाटतं ?’

‘तुम्ही मला तुमच्या बरोबर घेऊन चला पुण्याला, आणि नोकरी मिळवून द्या. कोणतेही काम करायला मी तयार आहे. मी एकटी राहिले तर माझी धडगत नाही. माझा चुलता मला मारून तरी टाकेल किंवा वाईट मार्गाला लावेल. तुम्ही मला एवढी भीक घाला. मी जन्मभर तुमची ऋणी राहीन.’

‘ते सर्व ठीक आहे.’ मी चाचपडलो. ‘अग, पण माझ्या बरोबर म्हणजे जरा कठीणच आहे. मी संसारी माणूस आहे, घरी बायको-मुलं आहेत. तुला मी माझ्या घरी कसं ठेवू ?’

‘माझ्यावर एवढे उपकार करा. माझं आयुष्य तुमच्या हातात आहे. फार विश्वासानं मी पहिल्यांदा हात पुढे केलाय कुणासमोर, त्याला आधार द्या. नाहीतर माझ्या आयुष्याला दिशा रहाणार नाही. वादळात सापडलेल्या नावेसारखी माझी अवस्था झालीय. तुम्ही तारलंत तर तरेन, नाहीतर बुडण्याशिवाय गत्यंतर नाही.’

‘अग पण जगात एवढे लोक असताना तू मलाच अशी विनंती का करतेस ?’

‘तेच मला कळत नाही. आत्ताच्या अगतिक परिस्थितीत तुम्हीच मला एकाएकी भेटलात. तुमच्या बोलण्या-चालण्यावरून तुम्ही नक्की मदत कराल असं वाटलं आणि म्हणूनच तुम्हाला बोलले हे सर्व ! मी अधीर झालो क्षणभर.

मला आता ही ब्याद गळ्यात पडायला नको होती. मी वैतागलो होतो. रात्रीचे अकरा वाजले होते. आणि अशावेळी एक स्त्री काही कारण नसताना माझ्या गळ्यात पडत होती. तिच्या

आयुष्याची दोरी माझ्या हातात देत होती. मी कोण ? माझा संबंध काय तिच्याशी? छे! मला शक्य नाही. हे असें नाही त्या भानगडीत स्वतःला लपेटून घेण्याचा माझा पिंड नव्हता. मी भ्याड होतो का? पण याला कोण भ्याडपणा म्हणेल ? मला काही कळत नव्हते. वेळ चालला होता. आणि मी दूरवर गडद होत जाणाऱ्या अंधारात शून्याकडे नजर लावून बसलो होतो.विचारा मागोमाग विचार माझ्या अंतरात कलह करत होते. मी शेवटी म्हणालो,

'ललिता मला हे जमायचं नाही; माफ कर.' आणि मी उठून ताडकन् चालू लागलो. पुन्हा एकदाही मागे वळून पहाण्याचे धाडस झाले नाही. न जाणो पुन्हा तिच्या चेहऱ्याचे ते करुण भाव पाहून अंतःकरण पिळवटून निघायचं आणि नाही त्या भानगडीत हात घालायचा मूर्खपणा व्हायचा....

.... माझ्या आयुष्यातील गेली तीन वर्षे मी असाच चालत होतो. ललिताला विसरून जाण्याच्या प्रयत्नात. माझा रोजचा जीवनक्रम मी निर्विकारपणे आक्रमीत होतो. मला बढती मिळाली होती . मी एक ऑफिसर झालो होतो. ललिताला विसरत होतो.

आणि तीच ही ललिता ! तीन वर्षापूर्वी अशी अचानक वादळासारखी भेटलेली; माझ्या सद्सद्विवेक बुध्दीला आव्हान देणारी; करूणेनं माझ्या समोर मदतीसाठी हात पुढे करणारी; स्वतःच्या भवितव्याविषयी भीषण चित्र रंगविणाऱ्या नजरेची ललिता- आज माझ्या समोर गात होती -

*‘मेरे आरज़ूकी कहानी बनी है।*

*मेरे दिलकी धडकनोंकी यादे चुनी है॥*

*आधी हकीकत और आधा है सपना।*

*न पूछो मेरे दिलसे दिलका तडपना॥’*

क्षणभर मला वाटलं, तिला विचारावं; ‘पुढे काय झालं ? इथं कशी आलीस? ’ पण माझं अपराधी मन मलाच हसलं. तिच्या नजरेला मी नजर देऊ शकत नव्हतो. तिच्या समोर मी उभा राहू शकत नव्हतो. मीच तिला दिलं होतं हे नाचणं, हे गाणं, ह्या ‘अदा’. हे सर्व माझ्यामुळं तर होतं. मी तर तिच्या त्या जीवनाचा शिल्पकार होतो.

माझं अंग घामानं ओलं झालं होतं. विचारांनी थैमान मांडलं होतं. आकाशाचे तुकडे झाले होते. जीवन त्या तुकड्या मध्ये विलीन होत चाललं होतं. मी एकाएकी उठून बाहेर चालू लागलो. तीन वर्षापूर्वी त्या रात्री मला ललिताकडं पहायचं नव्हतं म्हणून मी झपाझप चालत होतो त्या पेक्षा कितीतरी पटीनं जलद मी आता चालत होतो !!!

‘माणूस’ मार्च २८, १९७०

# टेकडी

टेकडी हा शब्द प्रकार लहानपणी शाळेत जेव्हा पहिल्यांदा ऐकला तेव्हा टेकडी आणि डोंगर यांतला फरक कळण्या इतकं वय नव्हतं आणि जरूरी तरी काय होती म्हणा! सध्याच्या काळात जगात इतके नवीन नवीन शोध लागताहेत; चंद्रावर माणूस चालून येतोय, पण आतापर्यंत कोणत्या उंचीपर्यंत पृथ्वीला टेंगुळ आले असेल तर त्याची टेकडी होते व त्या टेंगळाची किती उंच सूज झाली म्हणजे त्याचा डोंगर, पर्वत किंवा पर्वताची रांग वगैरे वगैरे होते हे कोणी सुटसुटीत भाषेत कसे लिहिले नाही याचे आश्चर्य वाटते. माझी आपली एक सूचना आहे की एका दमात ते पृथ्वीचे टेंगूळ पळत जाऊन चढता आलं तर ती टेकडी, बाकी सर्व डोंगर किंवा त्याचे मोठे भाऊ-बहिणी, पर्वत वगैरे !

जवळ जवळ प्रत्येक गांवाशेजारी एक टेकडी ही का असते याचा मला लहानपणापासून प्रश्न पडत असे. माझ आपलं असं मत झालं होतं की, गावाशेजारी टेकडी ही फक्त गावांत देऊळ बांधायला जागा किंवा परवानगी नसली तर, किंवा गांव नदीच्या शेजारी असेल तर पुराच्या गढूळ पाण्याची देवाला आंघोळ मिळू नये

म्हणून असते. पण कोल्हापूरहून पुण्याला आल्यावर आम्हाला नवीनच साक्षात्कार झाला.

त्याचं काय झालं, फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला तेव्हा त्याच्या मागच्या बाजूला हनुमान टेकडी आहे हे जेव्हा कळलं तेव्हा 'हे कॉलेज म्हणजे फार धार्मिक बरं कां !' असं माझ्या भाबड्या मनाला वाटल्याशिवाय राहिलं नाही. पहिल्या शनिवारी अस्मादिक नारळ घेऊन हनुमान टेकडीवर मारूतीच्या दर्शनाला अगदी पवित्र मनानं आणि नम्र मानेनं हजर ! त्या दिवसापासून आपली टेकडी विषयीची नम्र मान जरा वांकडी झालीय ! हनुमान टेकडी ही कॉलेजांतल्या मुलींना भेटण्याची एकांत जागा असते असा शोध लागल्यानंतर मी बावचळून गेलो नां ? त्या दिवसापासून प्रत्येक टेकडीकडे पाहण्याचा माझा दृष्टीकोन बदलला. हो, नम्र मान वाकडी झाल्यावर दृष्टीचा कोन बदलणारच !

त्या दिवसापूर्वी आयुष्यांत आलेल्या सर्व टेकड्या नजरेसमोर सरकून गेल्या. कोल्हापूरची टेमलाई,पुण्याची पर्वती, जयपूरची आमेर इ. इ. आपण काहीतरी पहायचं विसरून गेलो असे वाटल्यावाचून राहिलं नाही. त्या नंतर आयुष्यांत अनेक टेकड्या आल्या आणि प्रत्येक टेकडीच्या मागे असाच कांहीतरी इतिहास ( ? ) जाणून घेण्याची आमची उत्सुकता आमचा जीव धोक्यांत आणू पहाता पहाता वाचली.

गावाशेजारी टेकडी आहे किंवा नाही यावर त्या गावाचे व्यक्तिमत्व अवलंबून असतं असं आपलं मत आहे. त्यामुळे टेकडी वाल्या देशांतून टोरंटोत आल्यावर आजूबाजूला टेकडी नाही हे

पाहून जीव हिरमुसला. आणि माँट्रीयॉल आणि टोरांटो या दोन गांवात जो फरक आहे तो भाषेमुळे नसून माँट्रीयॉलचे ‘माउंट रॉयल’ या टेकडी मुळेच! यामुळे माँट्रीयॉलच्या व्यक्तिमत्व टोरांटोहून भिन्न आहे, अशी माझी ठाम समजूत झालीय !

मागच्या वर्षी जेव्हा टोरांटो शहर सुंदर करण्यासाठीच्या सूचना विचारण्यात आल्या तेव्हा मी आपली एक सूचना सादर केली की टोरांटो शेजारी एक टेकडी बांधून ( ? ) टाकावी, आणि आणखीन् जमलं तर त्यावर एक देऊळ पण बांधून टाकावं. त्या सूचनेचं पुढं काय झालं याची चौकशी करता आंतल्या गोटांतून कळलं की टोरांटोहून एक समिती पुण्याच्या हनुमान टेकडीची पाहणी करायला गेली आहे. वास्तविक मागच्या डिसेंबर पर्यंत ते लोक परत यायला हवे होते पण अजूनपर्यंत त्यांचा पत्ता नाही. कां त्यांना देखील एकाएकी टेकडी उमजली ? टेकडीच जाणें !

‘स्नेहबंध’ ( ऑक्टोबर १४, १९७५ )